# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

---------------------------------

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**सोमवार, दिनांक १६ मार्च, २०२६ / फाल्गुन २५, १९४७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **वैद्यकीय शिक्षण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** | |
| **(३)** | **मृद व जलसंधारण मंत्री** | |
| **(४)** | **उद्योग, मराठी भाषा मंत्री** | |
| **(५)** | **महिला व बालविकास मंत्री** | |
| **(६)** | **ग्रामविकास व पंचायत राज मंत्री** | |
| **(७)** | **कामगार मंत्री** | |
| **(८)** | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** | |

------------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - २५**

------------------------------------

**वसई- विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबत**

**(१) * २९१२२ श्रीमती स्नेहा दुबे (वसई) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई- विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ३ प्राथमिक आरोग्य केंद्रे व १२ उपकेंद्रे महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यास सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक २९ ऑक्टोबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जवळपास पाच वर्षांचा कालावधी उलटून गेल्यावरही सदरची प्राथमिक आरोग्य केंद्रे अद्याप महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, शहरातील वाढती लोकसंख्या, अस्वच्छता व प्रदूषण यामुळे साथीच्या रोगांची रुग्णसंख्या वाढत असल्याने पुरेशा वैद्यकीय सुविधा पुरविण्यास सदर प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या सुविधा अपुऱ्या पडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर प्राथमिक आरोग्य केंद्रे तातडीने महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) वसई-विरार महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जिल्हा परिषद, पालघर यांच्या अधिपत्याखालील सोपारा, निर्मळ व चंदनसार अशी ३ प्राथमिक आरोग्य केंद्रे व नायगाव, सांडोर, उमेळा, निर्मळ, चंदनसार, पेल्हार, बोळींज, चिखलडोंगरी, गोखिवरे, जुचंद्र, सातीवली व वालीव अशी १२ उपकेंद्रे वसई-विरार महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यास दिनांक २९/१०/२०२० च्या पत्राने सार्वजनिक आरोग्य विभागाची सहमती देण्यात आली आहे.

(२), (३), (४) व (५) सद्य:स्थितीत वसई-विरार महापालिका क्षेत्रातील रुग्णांना उपलब्ध आरोग्य संस्थाकडून रुग्णसेवा पुरविण्यात येत आहेत. जिल्हा परिषदेच्या अधिपत्याखालील प्राथमिक आरोग्य केंद्रे महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यासंदर्भात शासन निर्णय ग्राम विकास विभाग दिनांक २०/०७/१९९९ नुसार जमिन व इमारत हस्तांतर करण्यापूर्वी जमिनीचे मूल्यांकन करुन मूल्यांकनाप्रमाणे येणारी रक्कम प्रथम संबंधित नगरपालिका, नगरपंचायत किंवा महानगरपालिका यांच्याकडून वसुल करावी, अशी तरतूद आहे. तथापि, सदर प्रकरणी दिनांक १६/०७/२०२५ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार उक्तप्रमाणे ३ प्राथमिक आरोग्य केंद्रे व १२ उपकेंद्रे वसई-विरार महानगरपालिकेकडे विनामूल्य हस्तांतरणासंदर्भात मा. मंत्रीमंडळ बैठकीसमोर प्रस्ताव सादर करण्याच्या अनुषंगाने ग्राम विकास विभागास कळविण्यात आले आहे.

-----------------

## पुनवट (ता.वणी, जि.यवतमाळ) येथील ग्रामपंचायतीच्या मालकीची शासकीय जमीन खाजगी शिक्षण संस्थेस दिल्याबाबत

**(२)** * **२९९२४ श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) पुनवट (ता.वणी, जि.यवतमाळ) येथील ग्रामपंचायतीच्या मालकीची सुमारे १५ एकर (५.९९ हे.आर.) शासकीय जमीन ग्रामपंचायतीने असंविधानिकरित्या ठराव संमत करुन एका खाजगी शिक्षण संस्थेला शाळेचे बांधकाम करण्यासाठी दिल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी उपसरपंच, ग्रामपंचायत, पुनवट यांनी जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेकडे दिनांक २७ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नाही, हे खरे नाही.

मौजा पुनवट, ता.वणी, जि.यवतमाळ येथील गट क्र.१, क्षेत्र ०.७१ हे.आर व गट क्र.२ क्षेत्र ५.२८ हे.आर अशी एकूण ५.९९ हे.आर जमीन शासनाच्या (महसूल विभागाच्या) मालकीची “ह” वर्ग जमीन आहे. क्षेत्रीय महाप्रबंधक, वेस्टर्न कोल फिल्ड लिमिटेड वणी क्षेत्र यांनी त्यांच्या व्यवस्थापनाखाली चालविल्या जाणा-या डी.ए.व्ही.शाळेकरिता उपरोक्त जागा मागणी केल्याच्या अनुषंगाने तहसीलदार, वणी यांनी ग्रामपंचायत, पुनवट यांना नाहरकत सादर करण्याबाबत कळविले होते. त्यानुषंगाने ग्रामपंचायत, पुनवट यांच्या दिनांक २५/८/२०२५ रोजीच्या विशेष सभा ठराव क्र.२ अन्वये व दिनांक २४/०२/२०२६ रोजीच्या विशेष ग्रामसभा ठराव क्र.१ अन्वये प्रस्तावित जागा मंजूर करण्याबाबत नाहरकत दिल्याचे दिसून येत आहे.

सदर प्रकरणी विभागीय आयुक्त, अमरावती यांच्या दिनांक १३/०२/२०२६ रोजीच्या पत्रान्वये मौजा पुनवट, ता.वणी, जि.यवतमाळ येथील गट क्र.१ क्षेत्र ०.७१ हे.आर व गट क्र.२ क्षेत्र ५.२८ हे.आर अशी एकूण ५.९९ हे.आर शासकीय जागा डी.ए.व्ही पब्लिक स्कूल यांना मंजूर करण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्तावात त्रुटी आढळून आल्याने शासन पत्र दिनांक २७/०२/२०२६ अन्वये जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना त्रुटीपूर्तता अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. सद्य:स्थितीत जमीन प्रदानाबाबतचा प्रस्ताव हा शासनस्तरावर विचाराधीन असून सदर जागा अद्याप अर्जदार संस्थेस मंजूर करण्यात आली नसून उपरोक्त जमीन अद्यापही शासनाच्याच ताब्यात आहे.

(२) होय, हे खरे आहे,

उप सरपंच, ग्रामपंचायत पुनवट यांनी त्यांच्या दिनांक २७/०१/२०२६ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्याकडे सदर प्रकरणी तक्रार दाखल केल्याचे दिसून येत आहे.

(३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी तहसिलदार, वणी यांना अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तहसिलदार, वणी यांनी सादर केलेल्या अहवालान्वये सदर जागा " ह" वर्ग असून जमीन प्रदानाबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन असून अद्याप अर्जदार संस्थेस मंजूर करण्यात आली नसून उपरोक्त जमीन अद्यापही शासनाच्याच ताब्यात आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जालना एमआयडीसी नागेवाडी येथील जमीनीची संचालक मंडळाने नियमबाह्यरित्या विक्री केल्याबाबत

**(३) * २९७०० श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना एमआयडीसी नागेवाडी येथील शासनाच्या उद्योग उर्जा विभागामार्फत महाराष्ट्र स्टेट इंडस्ट्रियल क्लस्टर डेव्हलमेंट प्रोग्राम अंतर्गत फेज-३ प्लॉट नं पी-२ (३०००Sq.m) मे. सम्यक स्पायसेस क्लस्टर साठी शासनाने सन-२०१८ मध्ये दिलेली सर्व जमीन, मिक्सर, ट्रे-ड्रायर, व्हाय क्रेसिव्ह, रोटाग्रेव्हर, प्रिटींग मशीन आदी इमारत बांधकाम साहित्याची संचालक मंडळाने नियमबाह्यरित्या विक्री करुन शासनाचे कोटयवधी रुपयांचे नुकसान केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू क्लस्टरच्या सर्व साहित्यांची वार्षिक देखभाल दुरुस्तीची मर्यादा सन २०२५ मध्ये संपली असून सर्व साहित्य विनावापर पडले असल्याने यामध्ये शासनाच्या कोटयवधी रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने मे.सम्यक स्पायसेस क्लस्टरला नियमबाह्यरित्या मंजुरी देणारे अधिकारी व सुकाणू समितीतील संबंधित दोषींना निलंबित करणेबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

राज्य शासनाच्या महाराष्ट्र राज्य औद्योगिक समुह विकास योजनेंतर्गत राज्यस्तरीय सुकाणू समितीच्या दिनांक १५/०९/२०१८ रोजी संपन्न ८ व्या बैठकीत स्पायसेस क्लस्टर, जालना या औद्योगिक समूह प्रकल्पास सामायिक सुविधा केंद्र उभारणीसाठी मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार उद्योग संचालनालयाकडून सदर प्रकल्पाच्या रुपये २७८.९० लक्ष इतक्या प्रकल्प किंमतीचे अंतिम मंजूरी आदेश दिनांक ११/१०/२०१८ रोजी निर्गमित करण्यात आले असून त्यानुसार सदर प्रकल्प दिनांक २४/०८/२०२१ रोजी कार्यान्वित झालेला आहे. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जालना यांनी दिनांक ३०/०१/२०२६ रोजी सदर प्रकल्पास प्रत्यक्ष भेट देवून अंतिम मंजूरी आदेशानुसार मंजूर निकषांप्रमाणे यंत्रसामुग्री स्थापित असल्याची खातरजमा केली आहे.

महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजनेंतर्गत मंजूरीप्राप्त स्पाईसेस क्लस्टर जालना, प्लॉट नं.पी-२, फेज-३, अतिरिक्त औद्योगिक क्षेत्र एमआयडीसी, जालना या प्रकल्पाच्या मे.सम्यक स्पाईसेस क्लस्टर असोसिएशन, जिल्हा-जालना या विशेष वहन संस्थेने (SPV-Special Purpose Vehicle) जिल्हा उद्योग केंद्र जालना या कार्यालयाकडे भूखंड हस्तांतरीत करण्याबाबत कुठलाही ना-हरकत प्रमाणपत्रासाठीचा अर्ज सादर केलेला नाही. तसेच या कार्यालयाने भूखंड हस्तांतरणासाठी कोणतेही ना-हरकत प्रमाणपत्र सदर SPV ला दिलेले नाही.

तसेच, सदर भूखंडाच्या हस्तांतरणाचा कोणताही प्रस्ताव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे प्राप्त झालेला नसल्याचे प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांनी कळविले आहे. तसेच सदर भूखंडाचे हस्तांतरण झालेले नसल्याने सदरचा भूखंड मे. सम्यक स्पाईसेस क्लस्टर असोसिएशन, जिल्हा-जालना या SPV च्या नावाने असल्याचे प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांनी कळविले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**हिंजवडी (ता.मुळशी, जि.पुणे) येथील आयटी कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसह तक्रारींचे निवारण करणेबाबत**

**(४) * २७८८६ श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पंचतारांकित आयटी हब असलेल्या हिंजवडी (ता.मुळशी, जि.पुणे) मधील टीसीएस (TCS) आणि इतर आघाडीच्या आयटी कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांना कॉन्फरन्स रुममध्ये नेऊन दबावाखाली राजीनामा देण्यास भाग पाडले जाताना कोणतेही आर्थिक पॅकेज न देता बेकायदेशीर कामावरुन काढून टाकण्यात येण्याच्या घटना मोठ्या प्रमाणावर घडत असून या कंपन्यांमध्ये नोकरी सोडणे आणि जबरदस्तीने राजीनामे देण्याच्या सत्रामुळे आयटीयन्सच्या मनात असुरक्षितेची भावना निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयटी क्षेत्रात जबरदस्तीचे राजीनामे टाळण्यासाठी आणि सुसूत्र पद्धतीने कर्मचाऱ्यांची कपात (layoffs) नियमन करण्यासाठी स्पष्ट व बंधनकारक नियम तयार करण्याची आवश्यकता असून आयटीयन्सला कामगार कायद्यांच्या संरक्षणात्मक कक्षेत समाविष्ट करण्यासाठी आवश्यक दुरुस्त्या करुन कामाचे तास, फुल अँड फायनल सेटलमेंट, आणि पीएफ पालन (compliance) यावर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामाचे तास वाढविले जात असताना औद्योगिक विवाद अधिनियम (Industrial Disputes Act)अंतर्गत “कामगार (workman)” या संज्ञेची आयटी क्षेत्रासाठी स्पष्ट व्याख्या नसल्याने आयटीयन्स अजूनही अनेक संरक्षणात्मक कायदेशीर नियमांच्या बाहेर असल्याने फेअर बॅकग्राऊंड व्हेरिफिकेशन फुल अँड फायनल सेटलमेंटमध्ये होणारा विलंब, पीएफमध्ये होणाऱ्या तफावती तसेच ९० दिवसांच्या नोटीस पिरियडची सक्ती या गंभीर समस्यांवर योग्य आणि सक्षम तक्रार निवारण यंत्रणा उपलब्ध करण्याबाबत चिंचवड येथील लोकप्रतिनिधींनी मा. कामगार मंत्री यांना माहे डिसेंबर, २०२५ मध्ये लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार आयटीयन्स कर्मचाऱ्यांची सुरक्षितता व तक्रारीकरिता त्वरित निर्णय देणारी ‘फास्ट-ट्रॅक लेबर कोर्ट प्रणाली’ किंवा ‘आयटी ट्रायब्युनल’ सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

दिनांक २३/०९/२०२५ रोजी प्रसूतीच्या कारणाने रजेवर असताना श्रीमती पुजा भारती या महिला कर्मचाऱ्यास टीसीएस कंपनीने हिंजवडी, पुणे येथील कार्यालयात बोलावून दबाव टाकून राजीनामा घेतला

असल्याची तक्रार कामगार उप आयुक्त कार्यालयास दिनांक १३/११/२०२५ रोजी प्राप्त झालेली असून सदर प्रकरणी प्रसूती लाभ अधिनियम, १९६१ अंतर्गत कार्यवाही सुरु आहे.

तसेच, मे.इपीपीएस इन्फोटेक, विमाननगर, पुणे या कंपनीतील कर्मचारी श्रीमती प्रतिमा सुरज चव्हाण यांनी आस्थापनेविरुध्द दिनांक ३१/०७/२०२५ रोजी राजीनामा दिल्यानंतर माहे-जुलै, २०२५ चे वेतन रू.५०,०००/- प्रलंबित असल्याबाबतची तक्रार अपर कामगार आयुक्त, पुणे कार्यालयास केली आहे. सदर प्रकरणी उभयपक्षांमध्ये तोडगा काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. तक्रारदार व कंपनी व्यवस्थापन यांच्यासमवेत पुढील बैठक दिनांक ०७/०४/२०२६ रोजी ठेवण्यात आलेली आहे.

(२),(३) व (४) “आयटीयन्स कर्मचाऱ्यांच्या समस्यांवर योग्य आणि सक्षम तक्रार निवारण यंत्रणा उपलब्ध करण्याबाबत”, या विषयानुषंगाने चिंचवड येथील लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०२५ मध्ये लेखी पत्राद्वारे मागणी केली असल्याची बाब आढळून आलेली नाही.

सद्य:स्थितीत आयटी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या फुल अँड फायनल सेटलमेंटमध्ये होणारा विलंब, पीएफच्या तफावती, ९० दिवसांच्या नोटीस पिरीयडची सक्ती, ग्रॅच्युटी, इत्यादी तक्रारी प्राप्त झाल्यास वैयक्तिक सल्ला व्यवस्थापन सेवा (PAMS) अंतर्गत उभयपक्षांच्या बैठका घेऊन तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जातो किंवा उचित कायदेशीर मार्गाचा सल्ला देण्यात येतो.

कामावरुन कमी केले असल्यास सरकारी कामगार अधिकारी अथवा सहायक कामगार आयुक्त यांच्या स्तरावरुन समेट घडविण्याचा प्रयत्न केला जातो. प्रयत्नांती समेट घडवू शकला नाही अशा प्रकरणांची असफल म्हणून नोंद घेण्यात येऊन सदर प्रकरणे अभिनिर्णयार्थ कामगार न्यायालय अथवा औद्योगिक न्यायालय यांचेकडे संदर्भित केली जातात. सद्य:स्थितीत कार्यरत असलेले कामगार न्यायालय व औद्योगिक न्यायालयाद्वारे आयटी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचे दावे व प्रकरणे हाताळली जात आहेत.

नवीन औद्योगिक संबंध संहिता, २०२० मधील तरतुदी आयटी कर्मचाऱ्यांनाही लागू होतात. औद्योगिक संबंध संहिता, २०२० चे कलम ४४ अंतर्गत औद्योगिक न्यायाधिकरण ही वैधानिक व्यवस्था अस्तित्वात येणार आहे. संहितेमध्ये समेट अधिकारी व औद्योगिक न्यायाधिकरण यांची तरतुद करण्यात आली असल्यामुळे आयटी कर्मचारी आपल्या तक्रारी सदर समेट अधिकाऱ्यांकडे व औद्योगिक न्यायाधिकरणाकडे दाखल करु शकतील.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील कामा व आल्ब्लेस रुग्णालयात सुविधांअभावी रुग्णांची गैरसोय होत असल्याबाबत

**(५) * ३१३९० श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कामा व आल्ब्लेस रुग्णालयात स्त्री-कर्करोग शस्त्रक्रियेसाठी स्वतंत्र शस्त्रक्रियागृह (OT) उभारण्यासाठी रु. ५ कोटी इतका निधी मंजूर केला असून केवळ डॉक्टरांची कमतरता आणि प्रशासकीय कारणांमुळे सदर काम अद्याप सुरू झाले नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयातील कर्करोग (ऑन्कोलॉजी) विभागात सध्या केवळ एकच डॉक्टर कार्यरत असून यामुळे गरीब महिला रुग्णांच्या शस्त्रक्रिया प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंजूर झालेला निधी नवीन शस्त्रक्रियागृहाऐवजी जुन्याच यंत्रणेच्या दुरुस्तीसाठी वापरण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर रुग्णालयातील रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता रेडिओथेरपी आणि केमोथेरपी विभागातील रिक्त पदे भरणे, नवीन अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देणे तसेच ‘ब्रेकीथेरपी युनिट’ कार्यान्वित करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही. कामा व आल्ब्लेस रुग्णालयास स्त्री- कर्करोग शस्त्रक्रियेसाठी जिल्हा वार्षिक योजनेतून स्वतंत्र शस्त्रक्रियागृह (OT) उभारण्यासाठी रु.५ कोटी रकमेची प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. तथापि, सदर यंत्रणेची तूर्तास गरज नसल्याने सदर निधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाकरीता मंजूर करण्याबाबत संबंधित अधिष्ठाता यांनी जिल्हाधिकारी यांना कळविले आहे.
(२) हे खरे नाही, ५ डॉक्टर / अध्यापक कार्यरत आहेत.
(३) हे खरे नाही.
(४) रिक्त पदे भरण्याच्या सरळसेवेने / पदोन्नतीद्वारे भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. रेडीओथेरपी विभागात अत्याधुनिक रेडिओथेरपी मशीन दिनांक २५/०६/२०२५ रोजीपासून कार्यान्वित करण्यात आली आहे. ब्रेकीथेरपी युनिट कार्यान्वित करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील ग्रामीण भागात जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनांची कामे बंद असल्याबाबत**

**(६) * ३०५४३ श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामीण भागात प्रत्येक कुटुंबाला नळाद्वारे शुद्ध पाणी पुरवठा व्हावा या उद्देशाने सन २०१९ मध्ये जाहीर केलेल्या जल जीवन मिशनमधील पाणी पुरवठा योजना दिनांक ३१ मार्च, २०२४ रोजी पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असताना केवळ ५० टक्केच काम पूर्ण झाले असल्याने राज्यात पाणीपुरवठा योजनांची २५ हजार कामे ठप्प असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र शासनाने २०२५ या आर्थिक वर्षात एक रुपयाचा निधी दिला नसून राज्य शासनानेही पुरेसा निधी न दिल्याने ठेकेदार निधीसाठी पाठपुरावा करत असून त्यांनी मागील देयके मिळाल्याशिवाय कामे करण्यास नकार दिला आहे, हे ही खरे काय,
(३) असल्यास, सदर योजनेला केंद्र शासनाने सन २०२७ पर्यंत मुदतवाढ देवूनही ठेकेदारांना आधी केलेल्या कामांची देयके मिळत नसल्याने वाढीव मुदतीतही ही कामे पूर्ण होतील किंवा नाही याची साशंकता नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने सदर ठप्प असलेली कामे पूर्ण करणे व ठेकेदारांच्या कामांची उर्वरीत देयके अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

मा. अर्थमंत्री, केंद्र सरकार यांनी सन २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पामध्ये जल जीवन मिशनचा कालावधी माहे डिसेंबर, २०२८ पर्यंत वाढविण्याची घोषणा केली आहे. त्यानुसार केंद्रीय जल शक्ती मंत्रालयाच्या दिनांक १६ जून, २०२५ च्या पत्रान्वये जल जीवन मिशन कार्यक्रमास माहे डिसेंबर, २०२८ पर्यंत मुदतवाढ देण्याचे विचाराधीन असल्याचे त्याचप्रमाणे पाणी हा विषय राज्य सूची अंतर्गत येत असल्याने जोपर्यंत केंद्र शासनाकडून

निधी प्राप्त होत नाही, तोपर्यंत राज्यांनी स्वतःच्या निधीमधून जल जीवन मिशनच्या योजनांची अंमलबजावणी सुरु ठेवण्याबाबत कळविले आहे.

जल जीवन मिशन अंतर्गत राज्यात एकूण ५१५६० योजना समाविष्ट असून त्यापैकी २६४९९ योजनांची कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरीत २५०६१ योजनांची कामे विविधस्तरावर प्रगती पथावर आहेत.

(२) माहे सप्टेंबर, २०२४ पासून केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाला नाही. महाराष्ट्र राज्य पाणी पुरवठा कंत्राटदार संघटना यांनी दिलेल्या दिनांक ६/१२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये जल जीवन मिशन विषयक मागण्या पूर्ण न झाल्यास कामबंद करण्याबाबत कळविले आहे.

(३) जल जीवन मिशन अंतर्गत योजनांना निधीची कमतरता असल्याने कामांवर विपरित परिणाम झाला असून, कामांची गती मंदावली आहे.

(४) जल जीवन मिशन कार्यक्रमातंर्गत राज्यास सन २०१९-२० ते आतापर्यंत एकूण रू.३६२६९.५७ कोटी (राज्य हिस्सा रू.२०५३६.५६ कोटी व केंद्र हिस्सा रू.१५७३३.०१ कोटी ) निधी प्राप्त झाला आहे. योजना पूर्ण करण्याच्या दृष्टीने आणि कामांवर विपरित परिणाम होऊ नये म्हणून जल जीवन मिशन योजनेंतर्गत माहे सप्टेंबर, २०२४ पासून केंद्र हिस्सा अप्राप्त असतांना देखील राज्य शासनाने सन २०२४-२५ व सन २०२५-२०२६ या वित्तीय वर्षांमध्ये विशेष बाब म्हणून अनुक्रमे रु.२४८३.५८ कोटी व रु.२३४८.२९ कोटी असा एकूण रु.४८३१.८७ कोटी इतका निधी अंमलबजावणी यंत्रणेला उपलब्ध करुन दिला आहे. त्यामुळे पाणी पुरवठा योजनांच्या कामांची प्रगती चालू ठेवण्यास मदत होत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**तिलोंडा (आंबेपाडा) (ता. जव्हार, जि.पालघर) या गावासह इतर सर्व वाड्या, वस्त्या मुख्य रस्त्यांना जोडण्याबाबत**

**(७) * ३०८७५ श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड), श्रीमती स्नेहा दुबे (वसई) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिलोंडा (आंबेपाडा) (ता. जव्हार, जि.पालघर) येथे रस्त्या अभावी वेळेत उपचार न मिळाल्याने आजाराने ग्रस्त असलेल्या एका तरुणाचा दिनांक ४ फेब्रुवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान मृत्यू झाल्याची घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावापासून चार कि.मी. अंतरावरील आंबेपाडापर्यंत रस्ता नसल्याने परिणामी रुग्णांना डोलीतून दवाखान्यात घेऊन जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन सदर तालुक्यातील तिलोंडा गावासह इतर सर्व वाड्या, वस्त्या मुख्य रस्त्यांना जोडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे :** (१), (२) व (३) नाही, हे खरे नाही.

जव्हार तालुक्यातील तिलोंडा अंतर्गत चांभारशेत तिलोंडा मुख्य रस्ता (ग्रामीण मार्ग ९४) ते आंबेपाडा हा रस्ता अवर्गीकृत (non-plan) स्वरुपाचा असून ग्रामपंचायत हद्दीतील आहे. सदर रस्ता १८००.०० मीटरचा असून सदर रस्ता सन २०२४-२५ मध्ये महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेमधून माती-मुरुम व खडीकरण करणे यासह रु.४६.०० लक्ष निधीतून पूर्ण करण्यात आलेला आहे. सदर रस्त्याने आंबेपाडा या ठिकाणी सद्य:स्थितीमध्ये जीप, चारचाकी वाहन, इ. वाहनाद्वारे पोहचता येते. सदरचा रस्ता ग्रा.मा. ९४ या मुख्य रस्त्याला जोडलेला आहे. तसेच, आंबेपाडा जोडरस्ता डांबरीकरण करण्यासाठीचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीला सादर करण्यात आला आहे. निधी उपलब्धतेनुसार डांबरीकरणाचे काम करणे शक्य आहे.

मृत तरुण हे दीर्घकाळ गंभीर आजारी असल्याने दिनांक २९/१२/२०२५ ते दिनांक ०६/०१/२०२६ या कालावधीत कुटीर रुग्णालय, जव्हार येथे उपचारासाठी दाखल होते. तद्नंतर, त्यांना श्वसनाचा त्रास व शौचावाटे रक्त जात असल्याने दिनांक ०३/०२/२०२६ रोजी वेदांता वैद्यकीय महाविद्यालयाच्या रूग्णालयात भरती करण्यात आले व त्याच दिवशी संध्याकाळी त्यांचा फुफ्फुसाचा न्युमोनिया (Aspiration Pneumonia) मुळे मृत्यू झाला. त्यानंतर सदर मृत तरुणास वेदांता हॉस्पीटलच्या रुग्णवाहिकेमधून चांभारशेत तिलोंडा येथे मुख्य रस्त्यावर सोडण्यात आल्याचे निदर्शनास आले होते.

पालघर जिल्ह्यातील बारमाही रस्त्यांनी न जोडलेल्या गाव/ पाडे/ वस्त्या या मुख्य रस्त्यांनी जोडण्याच्या अनुषंगाने एकूण ४७ कामे मंजूर करण्याचा प्रस्ताव जिल्हा परिषद, पालघर यांनी दिनांक २२/०१/२०२५ रोजीच्या पत्रान्वये सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार यांना सादर केला आहे.

तसेच, जिल्हा परिषद, पालघर यांच्या अखत्यारितील ग्रामीण रस्त्यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम, आदिवासी उपयोजना, जिल्हा वार्षिक योजना, इ. योजनेंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात महात्मा ज्योतीराव फुले व प्रधानमंत्री जनआरोग्य योजनांच्या एकत्रित लाभासाठी उपाययोजना करण्याबाबत**

**(८) * २३५४० श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड), श्री.राजेश विटेकर (पाथरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अधिकाधिक नागरिकांना महात्मा ज्योतीराव फुले व प्रधानमंत्री जनआरोग्य या दोन्ही योजनेंतर्गत मोफत आणि कॅशलेस उपचार देणे बंधनकारक असून यांचा एकत्रित लाभ मिळावा यासाठी शासनाने शासकीय रुग्णालयाबरोबरच खाजगी रुग्णालयांना या योजनेंतर्गत आणण्याचा निर्णय दिनांक २ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत पात्र असलेल्या रुग्णांकडून खाजगी रुग्णालय प्रशासनाकडून अतिरिक्त पैसे घेतले जात असल्याच्या अनेक तक्रारी विभागाकडे प्राप्त झाल्या असून अकोला जिल्हयातील खाजगी रुग्णालयात सदर योजना कार्यान्वित असून व रुग्णांकडे या योजनेचे कार्ड असून देखील विविध तपासण्या व शस्त्रक्रियेसाठी तेथे पैसे घेत असल्याच्या तक्रारी दिनांक ११ जानेवरी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान प्राप्त झाल्या आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने रुग्णालयांवर कारवाई करणेसह शासकीय व खाजगी रुग्णालयातून या दोन्ही योजना राबविण्यासाठी पॅकेजच्या संख्या आणि खर्चात वाढ करणे तसेच या योजनेचा लाभ सर्वसामान्यांना मिळण्याकरिता व योजनेबाबत तक्रार करण्याकरिता ॲपची निर्मिती करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) अंशतः खरे आहे.

दिनांक ०२ जुलै, २०१२ रोजी तत्कालीन राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरू झाल्यापासून सदर आरोग्य संरक्षणाच्या योजनेमध्ये खाजगी रूग्णालयांचा समावेश करण्यात आला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) खाजगी रूग्णालयात सदर योजना कार्यान्वित असताना व रुग्णांकडे या योजनेचे कार्ड असताना देखिल विविध तपासण्या व शस्त्रक्रियेसाठी सदर रुग्णालये पैसे घेत असल्याबाबत राज्य आरोग्य हमी सोसायटीकडे वेळोवेळी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने अंगीकृत रूग्णालयांसोबत करण्यात आलेल्या करारनाम्यानुसार कारवाई करण्यात येते. आतापर्यंत प्राप्त तकारींच्या अनुषंगाने ३३८ प्रकरणी रु. ६०.४७ लक्ष इतका दंड अंगीकृत रूग्णालयांकडून वसूल करण्यात आला असून उर्वरित २६६ प्रकरणी चौकशीची कार्यवाही सुरू आहे.

अकोला जिल्ह्यातील खाजगी रूग्णालयात सदर योजना कार्यान्वित असताना व रुग्णांकडे या योजनेचे कार्ड असताना देखिल विविध तपासण्या व शस्त्रक्रियेसाठी सदर रुग्णालये पैसे घेत असल्याच्या एकूण बारा (१२) तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. सदर तकारींच्या अनुषंगाने राज्य आरोग्य हमी सोसायटीने केलेल्या चौकशीनुसार एका रुग्णास पैसे परत करण्यात आले असून संबंधित रूग्णालयावर नियमानुसार दंडात्मक कारवाई प्रस्तावित आहे. तसेच उर्वरित अकरा (११) तकारींच्या अनुषंगाने संबंधित रूग्णालयांना राज्य आरोग्य हमी सोसायटीमार्फत नोटिसा बजावण्यात आल्या असून चौकशी सुरू करण्यात आली आहे.

(४) शासनाच्या दिनांक ४/११/२०२५ रोजीच्या निर्णयानुसार एकत्रित आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा फुले जन आरोग्य योजनांतर्गत उपलब्ध उपचारांच्या संख्येत तसेच उपचारांच्या दरात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सदर योजनेचा लाभ सर्वसामान्यांना मिळावा यासाठी आयुष्मान ॲप निर्माण करण्यात आले असून त्याद्वारे नागरिकांना आपले आयुष्मान कार्ड तयार करणे, योजनेतील निकषांनुसार पात्रता तपासून किती रक्कमेचे उपचार उपलब्ध आहेत ते पाहणे, अंगीकृत रूग्णालय शोधणे व अभिप्राय नोंदविणे या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

सदर योजनेंतर्गत जिल्हा समन्वयक आणि क्षेत्रीय व्यवस्थापक यांच्यामार्फत अंगीकृत रूग्णालयांच्या वेळोवेळी तपासणी करण्यात येते. तसेच खाजगी रूग्णालयात सदर योजना कार्यान्वित असताना व रुग्णांकडे या योजनेचे कार्ड असताना देखिल विविध तपासण्या व शस्त्रक्रियेसाठी सदर रुग्णालये पैसे घेत असल्याबाबत राज्य आरोग्य हमी सोसायटीकडे वेळोवेळी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने अंगीकृत रूग्णालयांसोबत करण्यात आलेल्या करारनाम्यानुसार कारवाई करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय वैद्यकीय संस्थांमध्ये पोर्टेबल मॅग्नेटिक रेझोनान्स इमेजिंग (MRI) प्रणालींची अंमलबजावणी करणेबाबत

**(९) * २७३७७ श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सध्या वापरात असलेल्या पारंपरिक मॅग्नेटिक रेझोनान्स इमेजिंग ( MRI ) प्रणाली जड आणि स्थिर असून ती वापरण्यासाठी विशेष यंत्रणा आवश्यक असल्यामुळे अतिदक्षता विभागातील हालचाल करू न शकणाऱ्या रुग्णांना किंवा ग्रामीण भागातील रुग्णांना एम.आर.आय. उपलब्ध होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आपत्कालीन आणि न्यूरोक्रिटिकल केअर युनिट्स तसेच सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, जिल्हा रुग्णालये आणि तृतीय स्तरीय केंद्रांमध्ये पोर्टेबल मॅग्नेटिक रेझोनान्स इमेजिंग (MRI) यंत्रणा प्राधान्याने बसविणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार राज्यातील आरोग्य विषयक पायाभूत सुविधांचा दर्जा उंचाविण्यासाठी सर्व शासकीय वैद्यकीय संस्थांमध्ये पोर्टेबल मॅग्नेटिक रेझोनान्स इमेजिंग (MRI) प्रणालींची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही.
(२) सदर पोर्टेबल मॅग्नेटिक रेझोनान्स इमेजिंग (MRI) यंत्रणा प्राधान्याने बसविणे आवश्यक असल्याची बाब खरी नाही.
(३) विभागाच्या अधिनस्त १९ संस्थांमध्ये एम.आर.आय. सुविधा सद्य:स्थितीत उपलब्ध आहे. तसेच राज्यामध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय स्थापन करण्यासाठी दिनांक २३/०९/२०२१ रोजी सार्वजनिक खाजगी भागीदारी (पीपीपी) धोरण निश्चित केले आहे. त्याअंतर्गत मुंबई क्लस्टर अंतर्गत ०९ संस्था तसेच नागपूर क्लस्टर अंतर्गत ०५ असे एकूण १४ संस्थामध्ये बाह्यस्त्रोतामार्फत एम.आर.आय. सुविधा घेण्याकरीता कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.
(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

**पालघर जिल्ह्यामध्ये जलजीवन मिशन अंतर्गत झालेला गैरव्यवहार**

**(१०) * २७४२१ श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यात जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठ्याचे प्रकल्प महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून राबविले जात आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पालघर या एका जिल्ह्यामध्ये असलेल्या एकूण प्रकल्पांपैकी १४ प्रकल्पांचे कंत्राट आर. ए. घुले या एकाच कंपनीला देण्यात आल्याने या सर्व प्रकल्पांमध्ये मोठा गैरव्यवहार झाला असून "हर घर जल" या संकल्पनेची पायमल्ली होऊनही आर. ए. घुले या कंपनीच्या ठेकेदाराची व त्यांनी केलेल्या गैरव्यवहाराची अद्याप कोणतीच चौकशी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जिल्ह्यातील १४ पाणीपुरवठा प्रकल्पाची प्रत्यक्ष निर्मिती न करता अपूर्ण कामे करून देयके मात्र पूर्ण घेतली आहेत तसेच सदर कंत्राटदारास देण्यात आलेली पाणीपुरवठा प्रकल्पाचे कंत्राट पूर्णपणे बेकायदेशीर होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर जिल्ह्यातील या सर्व प्रकल्प निर्मितीचा कार्यकाळ काही ठिकाणी संपला असून काही ठिकाणी अवघ्या काही दिवसांत हा कार्यकाळ संपणार असताना अद्यापपर्यंत १० ते २० टक्के पेक्षा अधिक कामे पूर्ण करण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, जलजीवन मिशनच्या नकाशा प्रमाणे पालघर जिल्ह्यातील १४ प्रकल्पांपैकी एकाही प्रकल्पाचे काम पूर्ण झाले नसून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी शासनाला या प्रकल्पासंदर्भात सादर केलेला अहवाल खोटा, शासनाची दिशाभूल करणारा आणि कंत्राटदार घुले यांना पाठीशी घालणारा आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास,या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्याअनुषंगाने कामे पूर्ण न करता घेण्यात आलेल्या उचल रक्कम कंत्राटदाराच्या व अधिकाऱ्यांच्या मालमत्तेवर वैयक्तिक बोजा टाकून वसूल करणे व संबंधित

अधिकारी व कर्मचारी यांचे निलंबन करण्यासह कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकणेबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे खरे आहे.

पालघर जिल्हयामध्ये जल जीवन मिशन योजनेंतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जिल्हा परिषदेमार्फत पाणी पुरवठ्याच्या योजना राबविल्या जात आहेत.

(२) हे अंशतः खरे आहे.

पालघर जिल्हयामध्ये जल जीवन मिशन योजनेंतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत एकूण २६ योजना मंजुर आहेत. सदर २६ योजनांपैकी १५ योजनांची कामे शासनाने विहीत केलेल्या खुल्या ई-निविदा प्रक्रियेद्वारे पात्र ठरलेल्या संबंधित ठेकेदारास सोपविण्यात आलेली आहेत. कामे देण्याची प्रक्रिया शासनाने विहीत केलेल्या प्रक्रियेनुसार खुल्या ई-निविदेद्वारे पार पाडण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

संबंधित ठेकेदारास कामाची देयके ही केलेल्या कामाच्या प्रमाणात निविदेमधील नमूद अदायगी टप्प्याप्रमाणेच अदा केली आहेत. देयक अदायगी करताना कोणत्याही प्रकारची आगाऊ रक्कम अदा करण्यात आलेली नाही.

(४) हे अंशतः खरे आहे.

संबंधित ठेकेदाराकडे सोपविण्यात आलेल्या सर्व १५ प्रकल्पांची निविदा अटी शर्तीप्रमाणे मुदत संपलेली आहे. तथापि, याबाबत मुदतवाढ देण्याची कार्यवाही सुरू आहे. सदर १५ प्रकल्पांची कामे खालीलप्रमाणे विविध टप्प्यात प्रगतीपथावर आहेत.

| अ.क्र. | भौतिक प्रगती | योजनांची संख्या |
|---|---|---|
| १ | ० ते २५% | ० |
| २ | २६ ते ५०% | २ |
| ३ | ५१ ते ७५% | ६ |
| ४ | ७६ ते १००% | ७ |

(५) संबंधित ठेकेदाराकडे सोपविण्यात आलेल्या १५ प्रकल्पांची कामे वरीलप्रमाणे विविध टप्प्यात प्रगतीपथावर आहेत. जलजीवन मिशन अंतर्गत योजनेची कामे पूर्ण करण्यासाठी वन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग, जलसंपदा विभाग, रेल्वे विभाग इत्यादी विभागांची परवानगी प्राप्त करणे आवश्यक होते. तसेच योजनेसाठी आवश्यक उपांगासाठी ग्रामपंचायतीमार्फत जागा उपलब्ध करुन देण्यास विलंब झाल्यामुळे योजनांच्या अंमलबजावणीस विलंब झालेला आहे.

(६) संबंधित ठेकेदारास कामाची देयके ही केलेल्या कामाच्या प्रमाणात निविदेमधील नमूद अदायगी टप्प्याप्रमाणेच अदा केली आहेत. देयक अदायगी करताना कोणत्याही प्रकारची आगाऊ रक्कम अदा करण्यात आलेली नाही. प्रगतीपथावरील योजनेमधील ज्या उपांगाच्या कामांना ठेकेदारामार्फत अंमलबजावणी करण्यास विलंब झालेला आहे, त्यानुसार संबंधित ठेकेदारामार्फत अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या प्रगतीपथावरील एकूण १५ योजनांपैकी ११ योजनांच्या कामांवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. चौकशी करण्यात येईल.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**काठोडा (ता.नवापूर, जि.नंदुरबार) या ग्रामपंचायत हद्दीतील गायरान जमीन एमआयडीसीसाठी परस्पर संपादीत केल्याबाबत**

**(११) * ३०३५३ श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवापूर (जि.नंदुरबार) तालुक्यातील एमआयडीसीमध्ये स्थानिकांना डावलून परप्रातियांना प्राधान्याने रोजगार दिल्याने शासनाच्या सबसिडी अटींचे उल्लंघन होत असल्याचे आरोप स्थानिक नागरिकांनी केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोठडा (ता.नवापूर) येथील ग्रामपंचायत हद्दीतील गट क्र. २३, ४६ व ४७ ची जमीन ग्रामपंचायत कडून कोणतेही ना-हरकत प्रमाणपत्र (NOC) न घेता परस्पर एमआयडीसी नवापूरला हस्तांतरीत केली जात असल्याच्या हालचालींना ग्रामस्थांनी तीव्र विरोध करुन ग्रामपंचायतीच्या वतीने तहसिलदार, नवापूर यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे काय,

(३) असल्यास, सदर ग्रामपंचायती अंतर्गत येणाऱ्या भोनआमळा, फुलफळी, भोरदा व पत्राखडी या गावांमध्ये प्रामुख्याने आदिवासी समाजातील लोकांचे वास्तव्य असून पशुपालन हे त्यांचे उपजीविकेचे मुख्य साधन असल्याने या क्षेत्रातील गायरान जमिनी जर एमआयडीसी नवापूर तालुक्यास हस्तांतरीत केल्यास या परिसरातील पिकांचे स्त्रोत, विहीरी, बोअरवेल, तलाव, स्मशानभूमी इ. तसेच ग्रामस्थांच्या उपजीविकेवर परिणाम होऊन भविष्यात गंभीर परिस्थिती निर्माण होवू शकते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने सदर ग्रामपंचायतीच्या हद्दीतील गायरान जमीन (गुरचराईसाठी राखीव) महसूल अभिलेखात व सदर गटातील जमिनी ह्या ग्रामपंचायतीच्या ताब्यात असल्याची नोंद कायम ठेवण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) हे खरे नाही. म.औ.वि. महामंडळ भूखंडधारकांबरोबर करीत असलेल्या करारनाम्यामध्ये स्थानिकांना प्राधान्याने रोजगार उपलब्ध करून देणेबाबतची अट नमूद करण्यात येते. सदर अटीचे उल्लंघन होत असल्याची तक्रार म.औ.वि.महामंडळास प्राप्त झालेली नाही.

(२) प्रस्तुत प्रकरणी मौजे कोठडा (ता. नवापूर) येथील शासकीय जमिन गट नं. २३,४६ व ४७ ची म.औ.वि.अधिनिय-१९६१ चे कलम २ खंड (ग) ची अधिसूचना दिनांक १६/०९/२०११ रोजी शासन राजपत्रात प्रसिद्ध झाली आहे. मा. जिल्हाधिकारी, नंदुरबार यांचे दिनांक ०३/०६/२०१६ रोजीचे आदेशान्वये सदर शासकीय जमीन म.औ.वि.महामंडळास हस्तांतरीत झाली असून सदर जागा आज रोजी म.औ.वि.महामंडळाच्या ताब्यात आहे. तसेच ७/१२ वर म.औ.वि.महामंडळाच्या नावे नोंद घेण्यात आली आहे.

परंतु ग्रामपंचायत व गावकरी यांचा विरोध असून ते म.औ.वि.महामंडळाच्या विकास कामात अडथळा निर्माण करीत आहे. सदर जागा महसूल विभागाकडून रितसर हस्तांतर करण्यात आली आहे.

(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी मौजे नांदवन येथील गट नं. ४२ व मौजे कोठाडे येथील गट नं. २३, ४६ व ४७ येथील एकूण १९.०७ हे. आर शासकीय क्षेत्र मऔवि महामंडळास औद्योगिक करणासाठी नियमानुसार हस्तांतरीत करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) येथील तिर्थरूप नानासाहेब धर्माधिकारी उप जिल्हा रूग्णालयात डायलिसीस तज्ञ नेमण्याबाबत

**(१२) * २५८९५ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) येथील तिर्थरूप नानासाहेब धर्माधिकारी उप जिल्हा रूग्णालयात डायलिसीससाठी आवश्यक असणारे तज्ञ उपलब्ध नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गोरगरीब विशेषत: आदिवासी रूग्णांना मोफत डायलिसीस आरोग्य सुविधा मिळण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या डायलिसीस विभागात ६ डायलेसीस मशीन उपलब्ध असून एकच डायलिसीस तज्ञ उपलब्ध असल्यामुळे बहुतांशी रूग्णांना उक्त सेवेचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर रुग्णालयात रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून तातडीने डायलिसीस तज्ञ नेमण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

पनवेल (जि. रायगड) येथील तिर्थरुप नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयात एकूण ६ डायलिसीस मशिन उपलब्ध आहेत. तसेच, उपजिल्हा रुग्णालय पनवेल येथे जिल्हास्तरावरून On Call बेसिसवर नेफ्रोलोजिस्ट ची पदभरती करून डायलिसिस सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

गोरगरीब विशेषतः आदिवासी रुग्णांना मोफत डायलिसीस आरोग्य सुविधा मिळण्यासाठी सुरु करण्यांत आलेल्या डायलिसीस विभागात ६ डायलिसीस मशीन रुग्णसेवेसाठी कार्यान्वित असून उपचारार्थ आलेल्या डायलिसीस रुग्णांना कार्यरत असलेल्या डायलिसीस तंत्रज्ञाच्या देखरेखीखाली डायलिसीस सुविधा उपलब्ध होत आहेत.

(३) याबाबत डायलिसीस तज्ञ नेमण्याबाबतची कार्यवाही जिल्हा स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील शिळ - महापे रस्ता रुंदीकरण प्रकल्प करताना वनसंवर्धन कायद्याचे उल्लंघन झाल्याबाबत

**(१३) * ३१६५४ श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शीळ - महापे रस्ता (जि. ठाणे) रुंदीकरण करण्याकरीता वन विभागाच्या मालकीची एकूण १.९२२ हेक्टर जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सन २०२२ मध्ये स्वत:च्या नावे करून घेतली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जमिनीच्या बदल्यात मौजे ऐरोली गट क्र. १४५ पैकी २.३११६ हेक्टर क्षेत्रावर पर्यायी वनीकरण करण्याकरीता एम.आय.डी.सी.ने स्वतःची जमीन वन विभागास हस्तांतरित केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०२४ मध्ये वन विभागास वनीकरणासाठी हस्तांतरित केलेल्या क्षेत्रामध्ये ऐरोली येथील गट क्र. १४५ पैकी २.०४२ हेक्टर क्षेत्र व मौजे दिघा सर्वे नंबर १९५ पैकी उर्वरित ०.२६ हेक्टर क्षेत्रात एम.आय.डी.सी. ने परस्पर बदल करून हस्तांतरित केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त रस्ता रुंदीकरण प्रकल्प राबविण्याकरीता वन विभागाची एकूण १.९२२ हेक्टर जमीन हस्तांतर करतेवेळी केंद्र शासनाच्या वन विभागाच्या वनसंवर्धन अधिनियम, १९८० अंतर्गत एम.आय.डी.सी. ने केंद्राची अंतिम मान्यता घेतली नव्हती, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, वन विभागास पर्यायी वनीकरण करण्याकरीता राखीव ठेवलेले क्षेत्र एम.आय.डी.सी. ने परस्पर खाजगी विकासक 'नेव्हा ग्रुप' यांना वितरीत केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार केंद्र शासनाची मान्यता न घेता वनीकरण करण्याकरीता वन विभागास दिलेली जागा परस्पर खाजगी विकासकास वितरीत करून शासनाची दिशाभूल करणाऱ्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळा (एम.आय.डी.सी.) च्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) व (२) होय, खरे आहे.

सन २०२२ मध्ये शिळ - महापे रस्त्यांच्या रुंदीकरण व मजबूतीकरण करण्याकरीता वन विभागाकडील वळतीकरण झालेले १.९२२ हेक्टर क्षेत्र आहे.

(३),(४),(५) व (६) ठाणे वनविभागास वनक्षेत्राकरीता पर्यायी वनीकरणासाठी म.औ.वि. महामंडळाच्या संपादीत जमिनीमधून मौजे ऐरोली ता. व जि. ठाणे येथील गट नंबर १४५ पैकी (भूखंड OS -५ PT) २.३११६ हेक्टर क्षेत्राचा ताबा दिनांक ०८/०८/२०२२ रोजी म.औ.वि. महामंडळाकडून वन विभाग ठाणे यांना देण्यात आला.

वन परिक्षेत्र अधिकारी, ठाणे (प्रा) यांच्या दिनांक २८/०६/२०२४ रोजीच्या पत्रानुसार दिनांक ०८/०८/२०२२ रोजी ताबा दिलेले गट नंबर १४५ पैकी (भूखंड OS -५ PT) २.३११६ हेक्टर क्षेत्र पर्यायी वनीकरणास मोठया प्रमाणात डेब्रीज असल्यामुळे रोपवनांस योग्य नाही, म्हणून दुसरे पर्यायी क्षेत्र उपलब्ध करुन देण्यासाठी विनंती केली होती.

उपवनसंरक्षक, ठाणे वनविभाग यांचेकडील दिनांक २१/०८/२०२४ रोजीच्या पत्रान्वये, पर्यायी वनीकरणासाठी मौजे ऐरोली येथील सर्व्हे नंबर १४५ व मौजे दिघे येथील सर्व्हे नंबर १९५ मधील एकूण २.३११६ हेक्टर अतिक्रमण विरहीत रोपवनांस योग्य असे क्षेत्र वन विभागाच्या ताब्यात देण्यात यावे, अशी विनंती करण्यात आली. त्यानुषंगाने दिनांक ०१/१०/२०२४ रोजीच्या वन परिक्षेत्र अधिकारी, ठाणे (प्रा) यांचे कडील पत्रान्वये मौजे ऐरोली सर्व्हे नंबर १४५ (भूखंड OS -५ PT) क्षेत्र २.३११६ क्षेत्राचा ताबा परत देण्यात आला व नमूद क्षेत्राऐवजी पर्यायी क्षेत्र वन विभागास देण्यात आले असल्याने सदर क्षेत्रावर यापुढे वन विभागाचा कोणताही अधिकार राहणार नाही असे नमूद केले आहे.

म.औ.वि. महामंडळाने दिनांक ०१/१०/२०२४ रोजी ऐरोली गट क्रमांक १४५ पैकी क्षेत्र २.३११६ हेक्टर जागेचा ताबा वन विभागाकडून परत घेतला आहे. तसेच मौजे ऐरोली गट नंबर १४५ पै व मौजे दिघे गट नंबर १९५ पैकी क्षेत्र २.३११६ हेक्टर या (भूखंड क्रमांक ओएस-५ के) पैकी मधील पर्यायी जागेचा ताबा वन विभागास देण्यात आला आहे.

केंद्र शासनाचे पर्यावरण वन व जलवायू परीवर्तन मंत्रालय यांचेकडील पत्र क्रमांक ०६-MHB-२२/२०१४-BHO/१५१२, dated ०१/०९/२०१४ च्या पत्रान्वये तसेच महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील पत्र क्रमांक एफएलडी-१२१४/प्र. क्र ९३/एफ-१०, दिनांक १०/११/२०१४ च्या पत्रान्वये शिळ महापे रस्त्यांचे रुंदीकरण व मजबूतीकरण करण्यासाठी मौजे महापे ता.व जि. ठाणे येथील सर्व्हे क्रमांक २०२ सी व १४२ मधील एकूण १.९२२ हेक्टर वळती करण्याच्या प्रस्तावास काही अटींच्या आधीन राहून तत्वता मान्यता दिली आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौ.बोरगांव ग्रुप ग्रामपंचायत (ता.पेण,जि.रायगड) येथील आदिवासी पाड्यांकरिता रस्ता तयार करण्याबाबत**

**(१४) * २७७७० श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे बोरगांव ग्रुप ग्रामपंचायत (ता.पेण, जि.रायगड) येथील खवसावाडी, काजुचीवाडी, केळीचीवाडी, तांबडी आणि उंबरमाळवाडी या पाचही आदिवासी पाड्यांमधील ४५० लोकवस्ती असलेल्या नागरीकांना पेण-सुधागड तालुक्याच्या ठिकाणी जाण्यासाठी ६ कि. मी. अंतर टेकडीवरुन पायवाटेने जावे लागत असल्याने गावातील ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेने जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये मागणी करुनही रस्त्याचे काम पूर्ण झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे बोरगांव येथील खवसावाडी, काजुचीवाडी, केळीचीवाडी, तांबडी आणि उंबरमाळवाडी या पाचही आदिवासी पाड्यांमध्ये जाणाऱ्या रस्त्यांसाठी माहे जानेवारी, २०२४ मध्ये मे. सिध्दिविनायक कन्स्ट्रक्शन या कंपनीला रुपये ७ कोटी ६० लाख इतका निधी उपलब्ध करुन देवूनही रस्त्यांची कामे सुरु करण्यातआले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुषंगाने मौजे बोरगांव येथील खवसावाडी, काजुचीवाडी, केळीचीवाडी, तांबडी आणि उंबरमाळवाडी या पाचही आदिवासी पाड्यांसाठी रस्ता तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे :** (१), (२), (३) व (४) मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा - II अंतर्गत रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील पेण ते खवसा, उंबरवाडी, तांबडी या रस्त्याच्या कामास दिनांक ०८/०३/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.२६०.२७ लक्ष इतक्या किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक २५/०१/२०२४ रोजी देण्यात आला आहे. तथापि, सदर रस्त्याच्या कामामध्ये खाजगी व वन विभागाच्या जागेची अडचण असल्याने काम सुरु करण्यास विलंब झाला.

सद्य:स्थितीत खाजगी मालकाकडून रस्ता बांधण्याची संमती मिळाली आहे. तसेच, वन विभागाकडून दिनांक २७/०५/२०२५ रोजी मंजुरी प्राप्त झाली आहे. सद्य:स्थितीत खाजगी व वन विभागाच्या जागेतून रस्ता बांधणेचे काम प्रगतीत असून माहे मे, २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील कामगार विमा योजनेंतर्गत असलेल्या रुग्णालयांना सुविधा पुरविण्याबाबत**

**(१५) * २८०२७ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी मुंबई, पुणे, कोल्हापूरसह राज्यात १२ कामगार विमा रुग्णालये कार्यरत असून या माध्यमातून अंदाजे ४९ लाख कामगारांना उपचार मिळतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य कामगार विमा योजनेंतर्गत येत असलेल्या रुग्णालयांमध्ये अपुऱ्या सुविधा व औषधांचा तुटवडा भासत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त रुग्णालयांमध्ये अत्याधुनिक यंत्रसामग्री उपलब्ध नसून मागिल तीन वर्षांपासून सहा अतिदक्षता विभाग (आयसीयू) विनावापर असल्याचे तसेच वैद्यकीय विशेषज्ज्ञ, वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, लिपिक संवर्ग, पॅरामेडिकल ते चतुर्थ श्रेणी पदांवरील कर्मचाऱ्यांचा तुटवडा असल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार राज्य कामगार रुग्णालयांमधील सुविधा पूर्ण क्षमतेने कार्यरत करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील संघटीत क्षेत्रातील ४९,१४,७९० नोंदणीकृत विमाधारक व त्यांच्या कुटुंबियांना राज्यातील राकावि सोसायटीच्या अधिपत्याखाली १२ रुग्णालये, राकावि महामंडळाची ०३ रुग्णालये, १११ सेवा दवाखाने व दुय्यम वैद्यकीय सुविधेकरीता टायअप करण्यात आलेल्या ४७७ खाजगी रुग्णालयातून उपचार पुरविण्यात येत आहेत.
(२) व (३) हे खरे नाही.

राकावि रुग्णालयांमार्फत रुग्णांना ॲलोपॅथिक, आयुर्वेदिक, होमियोपॅथिक व युनानी इ. प्रकारची औषधीं तसेच कॅन्सर, हेमोफिलीया, ऑर्गन फेल्युअर इत्यादी आजारांकरीता आवश्यक व महागड्या स्वरुपाची अतिविशिष्ट औषधी सुद्धा विमारूग्णांना उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

राज्यातील मुलुंड, एमजीएम, कांदिवली, पुणे, नाशिक, सोलापूर, छत्रपती संभाजी नगर व नागपूर या आठ राकावियो रूग्णालयांत माहे ऑगस्ट ते सप्टेंबर, २०२५ मध्ये १० खाटांचे आयसीयू सुरु करण्यात आले असून दिनांक ०६/०३/२०२६ पर्यंत सदर ०८ आयसीयू मार्फत एकूण ३१५१ रुग्णांना उपचार पुरविण्यात आले आहेत.

राकावियो रुग्णालयांकरीता वेळोवेळी मोठ्या व महागड्या स्वरूपाची अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे व यंत्रसामुग्री हाफकीनमार्फत उपलब्ध करुन देण्यात आलेली असून चालू आर्थिक वर्षामध्ये १३२ अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे व १०५ यंत्रसामुग्री उपलब्ध करून देण्याबाबत पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

राकावि योजनेकरीता एकूण ५०८३ पदे मंजूर असून सद्य:स्थितीत त्यापैकी २२०८ पदे भरलेली व २८७५ पदे रिक्त आहेत. तथापि रिक्त पदांमुळे वैद्यकीय सेवेवर परिणाम होऊ नये याकरीता सोसायटी मार्फत विशेषज्ञ, वैद्यकीय व समवैद्यकीय अधिकारी कर्मचाऱ्यांचे एकूण २६७० मनुष्यबळ कंत्राटी स्वरुपात उपलब्ध करून घेण्यात आलेले आहे.
(४) होय.

सर्व राकावियो रुग्णालये पूर्ण क्षमतेने कार्यरत करण्याच्या दृष्टीने, सदर रुग्णालयांमध्ये डेंटल युनिट, मॉड्यूलर ओटी व लेबर रूम, सीटी स्कॅन, एमआरआय, डायलिसिस सेंटर सुरु करणे, उर्वरीत राकावियो रुग्णालयांमध्ये आयसीयू सुरु करणे, नवीन एमजीपीएस स्थापित करणे, एसएनसीयू सुरु करणे, सीएसएसडी स्थापित करणे, कार्डियाक केअर युनिट सुरु करणे, पॅथॉलॉजी लॅब तसेच वॉर्ड अद्ययावत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात १०८ क्रमांकाच्या रुग्णवाहिकांच्या संख्येत वाढ करणेबाबत**

**(१६) * २३६३६ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), डॉ.मिलिंद नरोटे (गडचिरोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खेड्या पाड्यापर्यंत वैद्यकीय सेवा देणारी १०८ क्रमांकाच्या ९३७ रुग्णवाहिकांपैकी बहुतांश रुग्णवाहिका विहित मर्यादेपेक्षा जास्त कालावधी व जास्त किलोमीटर धावल्याने त्या कालबाह्य झाल्या असून त्या सातत्याने बंद पडत असल्याने आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांची गैरसोय होत असल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, गडचिरोली जिल्हा सामान्य रुग्णालय तथा उपजिल्हा रुग्णालयांमध्ये लगतच्या चंद्रपूर जिल्ह्यातील सावली, सिंदेवाही, ब्रह्मपुरी तालुक्यातील रुग्ण व गर्भवती महिला उपचारांकरिता येत असून तेथे उपलब्ध असलेल्या क्रमांक १०८ रुग्णवाहिका रुग्णांना वेळेत सेवा देण्यात अपुऱ्या पडत असल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार राज्यात नवीन रुग्णवाहिका तातडीने उपलब्ध करून देणे तसेच रुग्णवाहिकांच्या संख्येत वाढ करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील आपत्कालीन वैद्यकीय सेवा प्रकल्प (१०८) च्या काही रुग्णवाहिका यांची धावसंख्या जास्त झाली आहे हे खरे आहे. परंतु सद्य:स्थितीत उपलब्ध असलेल्या सर्व रुग्णवाहिकांचे प्रादेशिक परिवहन विभागाकडून (RTO) फिटनेस प्रमाणपत्र (Fitness Certificate) प्राप्त करूनच त्या रुग्णसेवेसाठी कार्यान्वित ठेवण्यात आल्या आहेत. त्यामुळे रुग्णसेवेत कोणताही खंड पडलेला नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

गडचिरोली जिल्हा सामान्य रुग्णालय तथा उपजिल्हा रुग्णालयांमध्ये लगतच्या चंद्रपूर जिल्ह्यातील सावली, सिंदेवाही, ब्रह्मपुरी तालुक्यातील रुग्ण व गर्भवती महिला उपचारांकरिता येतात हे खरे आहे. मात्र रेफरल ट्रान्सपोर्ट (१०२) प्रकल्पातंर्गत रुग्णवाहिका सुद्धा रुग्णांना उपलब्ध करून देण्यात येतात आणि सेवा पुरविण्यात येत आहेत.

(३) आपत्कालीन वैद्यकीय सेवा (१०८) या प्रकल्पाअंतर्गत वाढत्या लोकसंख्येच्या निकषानुसार राज्यात रुग्णवाहिकांची संख्या ९३७ वरून १७५६ इतकी वाढविण्यास शासनाने मान्यता दिली आहे. या प्रकल्पांतर्गत नवीन सेवा पुरवठादाराची (Service Provider) नियुक्ती करण्यात आली असून, त्यांच्यामार्फत नवीन अत्याधुनिक रुग्णवाहिका उपलब्ध करून घेण्याची कार्यवाही सद्य:स्थितीत प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील खाजगी रुग्णालयांकडून उपचारासाठी अवाजवी व अनियंत्रित शुल्क आकारले जात असल्याबाबत**

**(१७) * ३०९२६ श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड), श्री.राजेश विटेकर (पाथरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्यातील खाजगी रुग्णालयांकडून उपचारासाठी अवाजवी व अनियंत्रित शुल्क आकारले जात असल्याने आर्थिक स्थिती नसलेल्या रुग्णांचा उपचारा अभावी मृत्यू झाल्याच्या अनेक घडना घडल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील रिलायन्स, लिलावती इ. रुग्णालयांमध्ये आयसीयू,व्हेंटिलेटर व इतर उपचारांचे महागडे दर निश्चित करण्यासाठी नियम, अधिनियम किंवा दरनियंत्रण यंत्रणा लागू केलेली आहे काय,
(३) असल्यास, रोकड विरहित विमा असल्यावर मोठ्या प्रमाणावर देयके आकारले जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार नियम व दरनिश्चितीचे उल्लंघन करुन रुग्णांकडून जादा शुल्क आकारणाऱ्या खाजगी रुग्णालयांवर कारवाई करणेसह शुल्क नियंत्रण ठेवण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.
(२) महाराष्ट्र शुश्रुषा गृह नोंदणी नियम,२०२१ नुसार उपचारांसाठी कोणतीही कमाल किंवा निश्चित शुल्क दरमर्यादा निश्चित केलेली नाही. मात्र,रुग्णांच्या माहितीसाठी दरसूची रुग्णांना सहज दिसेल अशा ठिकाणी किंवा प्रवेशस्थळी उपलब्ध असणे बंधनकारक आहे.
(३) व (४) हे खरे नाही.
महाराष्ट्र शुश्रुषा गृह नोंदणी नियम,२०२१ मधील तरतूदींचे तसचे या तरतूदींना अनुसरुन रुग्णालयाने निश्चित करुन प्रसिद्ध केलेल्या दरांचे रुग्णालयाकडून उल्लंघन होत असल्याचे आढळून आल्यास महाराष्ट्र शुश्रुषा गृह नोंदणी नियम,२०२१ मधील तरतूदींनुसार योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश स्थानिक पर्यवेक्षीय अधिकारी यांना देण्यात आले आहेत. तसेच खासगी रुग्णालयांची नियमित तपासणी करण्याबाबत आदेशीत करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात बंद असलेली बालगृहे सुरु करणेबाबत**

**(१८)** * **२३९९८ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर)** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मुला/मुलींसाठी असलेल्या अनेक बालगृहांपैकी ९४ बालगृहे कार्यान्वित नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ही बंद अवस्थेतील बालगृहे पुन्हा सुरू करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली यांचे स्पष्टीकरण देण्याचे निर्देश मा. मुंबई उच्च न्यायालयाने माहे एप्रिल, २०२५ च्या पहिल्या आठवडयात शासनाला दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार बंद अवस्थेतील बालगृहे पुन्हा सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांसाठी ९४ बालगृहांना मान्यता देण्यात आली होती. सदर संस्थांना बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ व महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ नुसार प्रमाणपत्र देण्यात आले होते. परंतु सदर संस्थांनी त्यांच्या स्तरावरील कारणांमुळे संस्था कार्यन्वित केलेल्या नाहीत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अखिल भारतीय मराठी साहित्य मंडळाच्या मागण्यांबाबत

**(१९) * ३११५६ श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी भाषेला अभिजात दर्जाचे लाभ देणारा कोणताही आदेश केंद्र शासनाने जारी केलेला नसल्याने तो जारी करावा या मागणीसह एकूण १७ ठराव अखिल भारतीय मराठी साहित्य मंडळाच्या वतीने सातारा येथे झालेल्या समारोप प्रसंगी केली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साहित्य संमेलनात मराठी भाषेला लाभ देणे, राज्यातील १४००० मराठी शाळा सुरू ठेवण्यात याव्यात चाळीस हजार शाळेत ग्रंथपाल नेमणे यासह एकूण १७ ठरावाच्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) हे खरे आहे.

(२) दिनांक ०१ जानेवारी २०२६ ते दिनांक ०४ जानेवारी २०२६ या कालावधीत सातारा येथे ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन संपन्न झाले. सदर संमेलनात करण्यात आलेले एकूण १७ ठराव शासनास प्राप्त झाले आहेत. सदर ठराव हे मराठी भाषा विभाग तसेच अन्य मंत्रालयीन विभागाच्या कामकाजाशी संबंधित आहेत. सदर ठराव शासनपत्र दिनांक १२/०१/२०२६ अन्वये संबंधित विभागांना उचित कार्यवाहीस्तव पाठविण्यात आले होते. सदर ठरावांच्या अनुषंगाने मंत्रालयीन विभागांकडून प्राप्त झालेला कार्यवाहीचा अहवाल खालीलप्रमाणे आहे,

ठराव क्र.१ बाबत - राज्यात कोणत्याही शाळेमध्ये हिंदी वा तिसरी भाषा सक्ती लादली जाणार नाही या ठरावासंदर्भात शालेय शिक्षण विभागास उचित कार्यवाही करण्यासाठी पत्र पाठविण्यात आले आहे.

ठराव क्र.२ बाबत - राज्यात सन २०२५-२६ च्या युडायस प्लस रिपोर्ट नुसार १,०८,०७० शाळा सुरू आहेत. त्यापैकी ६४,४७९ शाळा शासकीय असून, २५,४९८ शाळा अनुदानित/अंशतः अनुदानित आहेत. तसेच १८,०९३ शाळा खाजगी व्यवस्थापनामार्फत चालविल्या जातात. त्यामुळे राज्यातील शासकीय अथवा खाजगी, अनुदानित/विनाअनुदानित शाळा बंद करण्याबाबत राज्य शासनाचे कोणतेही धोरण नाही. मराठी माध्यमाच्या शाळा बंद करण्याबाबत कोणत्याही स्वरूपाच्या सूचना विभागाकडून निर्गमित करण्यात आलेल्या नाहीत.

ठराव क्र.३ बाबत - राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अंशतः/पूर्णतः अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांसाठी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी सुधारित आकृतीबंध लागू करण्यात आला आहे. त्यानुसार अर्धवेळ ग्रंथपाल पदास मृत संवर्ग म्हणून घोषित करण्यात आले आहे. तसेच इयत्ता ६ वी ते १२ वी मधील १००१ पेक्षा जास्त विद्यार्थी संख्येस एक पूर्णवेळ ग्रंथपाल पद अनुज्ञेय करण्यात आले आहे. अशा पूर्णवेळ ग्रंथपाल पदांची संख्या २११८ इतकी आहे. मा. न्यायालयाने शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे आकृतीबंधास स्थगिती दिल्याने पदे भरण्यात येत नव्हती. सदरची स्थगिती उठली असून, सदरची पदे भरण्याचा मार्ग उपलब्ध झालेला आहे. तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांची पदे काही अटींच्या अधिन राहून १०० टक्के पदे सरळसेवेने भरण्याबाबतचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे यांचेकडून दिनांक २८/०५/२०२५ च्या पत्रान्वये सन २०२४-२५ ची संचमान्यता पूर्ण झाल्यावर रिक्त पदांचा आढावा घेऊन अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन पूर्ण झाल्यानंतर शिक्षकेत्तर कर्मचारी पदभरती लवकरात लवकर करण्याबाबत शासन प्रयत्नशील आहे.

ठराव क्र.४ बाबत- भाषा सल्लागार समितीने शासनास सादर केलेल्या ५६ पानी भाषा धोरणाच्या प्रारुपातील शिफारशी ज्या विभागाशी संबंधित आहेत, अशा सर्व विभागांना पाठविण्यात आल्या व शिफारशींबाबत त्यांचे अभिप्राय घेण्यात आले होते. भाषा धोरणातील शिफारशी व संबंधित विभागाकडून प्राप्त झालेले अभिप्राय याबाबत सचिव, मराठी भाषा व तत्कालीन मा. मंत्री मराठी भाषा यांच्या स्तरावरील बैठकीत अधिनस्त कार्यालयांच्या

अध्यक्षांशी चर्चा करुन हे धोरण मा मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आले व मा. मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतरच सदर धोरण शासन निर्णय, दिनांक १४/०३/२०२४ अन्वये प्रसिद्ध करण्यात आले आहे. सदर धोरणाचे पुनरावलोकन करण्यात येत आहे.

ठराव क्र.५ बाबत - सन २०२४ मध्ये रिद्धपूर जि. अमरावती येथे मराठी भाषा विद्यापीठाची स्वतंत्र विद्यापीठ म्हणून उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत स्थापन करण्यात आली आहे. सदर विद्यापीठ मराठी भाषेचे जतन, संवर्धन, प्रचार व प्रसार सक्षमपणे व व्यापकतेने करीत आहेत. तसेच मराठी भाषा धोरणातील उद्दिष्ट क्र. ५ अन्वये ज्ञान-विज्ञान, तंत्रज्ञान, कृषि, वैद्यकशास्त्र, विधि व अभियांत्रिकी इत्यादी सर्व ज्ञान शाखांमधील उच्च शिक्षणासाठी इंग्रजी सोबत ऐच्छिक स्वरूपात मराठी माध्यम उपलब्ध करून देण्याची तरतूद नमूद आहे. सदर उद्दिष्टानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

"आंतरराष्ट्रीय मराठी" विद्यापीठामार्फत ज्या स्वरुपाचे कामकाज करणे अपेक्षित आहे, त्यानुसार मराठी भाषा विद्यापीठ यांच्यामार्फत प्रकल्प हाती घेणेबाबत अवगत केले जाईल. तसेच आवश्यकतेनुसार मराठी भाषा विभागही त्यास सहकार्य करील.

ठराव क्र.६ बाबत - माहे नोव्हेंबर, १९५६ मध्ये झालेल्या राज्यांच्या पुनर्रचनेत तत्कालीन मुंबई राज्यातील बेळगाव, विजापूर, धारवाड व कारवार हे मराठी भाषिक जिल्हे म्हैसूर राज्यात विलीन करण्यात आले. महाराष्ट्राने खेडे हे एक घटक, भौगोलिक सलगता, मराठी किंवा कन्नड भाषिक लोकांची सापेक्ष बहुसंख्या तसेच लोकेच्छा या सूत्रानुसार फेररचनेची मागणी केली. महाराष्ट्र राज्य शासनाने दावा केलेल्या ८६५ गावांपैकी २६४ गावे महाराष्ट्र राज्यात समाविष्ठ करण्याची महाजन आयोगाने शिफारस केली. तथापि महाजन आयोगाच्या शिफारशी मान्य न झाल्याने, तसेच सामोपचाराने प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न विफल ठरल्याने महाराष्ट्र शासनाने केंद्र शासन व कर्नाटक राज्य शासन यांच्याविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात दिनांक २९/०३/२००४ रोजी मूळ दावा क्र.४/२००४ (Original Suit) दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये शासनाची बाजू मांडण्यासाठी शासनाने तज्ञ व अनुभवी वकीलाची टिम (Battery of Advocates) तयार केली आहे.

सदर दाव्यामध्ये दिनांक १३/१२/२०१२ रोजी न्यायालयाने महाराष्ट्र व कर्नाटक राज्यामध्ये वादाचे प्राथमिक व मुख्य असे २१ मुद्दे निश्चित केले आहेत. तसेच दिनांक १२/०९/२०१४ रोजी झालेल्या सुनावणीअंती मा. सर्वोच्च न्यायालयाने दाव्यातील साक्षीपुरावे नोंदविण्यासाठी मा. कोर्ट कमिशनर म्हणून श्री. मनमोहन सरीन, भूतपूर्व मुख्य न्यायाधीश, जम्मू व काश्मीर यांची नियुक्ती केली आहे. त्यावर दिनांक १२/०९/२०१४ रोजी पारीत केलेल्या आदेशात सुधारणा करावी या उद्देशाने कर्नाटक शासनाने दिनांक ०६/१२/२०१४ रोजी १.A.१२/२०१४ मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केला. त्यावर सुनावणी पूर्ण होईपर्यंत मा. कोर्ट कमिशनर यांचेपुढे साक्षीपुरावे तपासण्याचे कामकाज तात्पुरते स्थगित आहे. दरम्यान १.A.१२/२०१४ वर मा. सर्वोच्च न्यायालयात दिनांक ०९/०१/२०१५ रोजी झालेल्या सुनावणीत सदर प्रकरण त्रिसदस्यीय खंडपीठापुढे ठेवण्याचे निर्देश दिले. दिनांक २३/०१/२०१७ रोजीच्या I.A. १२/२०१४ वरील सुनावणीमध्ये दिनांक १३/१२/२०१२ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने निश्चित केलेल्या वादाच्या मुद्यांतील मुद्दा क्र.१ नुसार, मूळ दाव्यामधील कर्नाटक शासनाने दाव्याच्या वैधतेबाबत उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने, वादी व प्रतिवादी यांनी पुढील सुनावणीपूर्वी आपले म्हणणे मांडावे, असे मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने आपले म्हणणे मा. सर्वोच्च न्यायालयात दिनांक ०९/१०/२०१७ रोजी दाखल केले. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २३/०१/२०१७ रोजी दिलेले आदेश मागे घेण्याचीही महाराष्ट्र शासनाने दिनांक २२/०५/२०१९ च्या शपथपत्राद्वारे विनंती केली आहे. सदर दाव्याची दिनांक ०८/०१/२०१९ पासून वेळोवेळी ठेवण्यात आलेली सुनावणी विविध कारणास्तव होऊ शकली नाही.

सद्यःस्थितीत, मा. न्यायालयात केवळ Admission च्या प्रकरणावरच सुनावणी होत असून आठवडयातून एकाच दिवशी Regular प्रकरणांवर सुनावणी आयोजित केली जात असल्याची वस्तुस्थिती ॲडव्होकेट ऑन रेकॉर्ड यांनी दिनांक ३०/०१/२०२५ च्या पत्रांन्वये सादर केली आहे. तसेच सदर दावा सुनावणीसाठी लवकरात लवकरात घेण्यासाठी दाव्याचे ॲडव्होकेट ऑन रेकॉर्ड यांनी मा. सर्वोच्च न्यायालयास दाखल केलेल्या विनंती अर्जावर दि. २७/१०/२०२५ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये, सदर दावा दिनांक २१ जानेवारी, २०२६ रोजी सुनावणीकरीता ठेवण्याबाबत मा. न्यायालयाने आदेश दिले. तथापि, त्रिसदस्यीय खंडपीठ तयार नसल्याने सदर दावा त्या रोजीच्या सुनावणी यादीमध्ये दर्शविण्यात आला नाही. सदर दाव्याची सुनावणी त्रिसदस्यीय खंडपीठ नियुक्तीनंतर घेण्यात येईल, असे कळते.

बेळगावसह सीमाभागांमध्ये निर्माण झालेला तणाव व महाराष्ट्र-कर्नाटक सीमा वादामध्ये राजकीय वादावर तोडगा काढण्यासाठी, केंद्र सरकारने प्रथमच थेट हस्तक्षेप करुन न्यायालयातील प्रश्न सुटेपर्यंत दोन्ही राज्यांनी सीमा भागांवर दावे करु नयेत, यासाठी दिनांक १४/१२/२०२२ रोजी मा. केंद्रीय गृहमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र व कर्नाटक राज्याच्या मा. मुख्यमंत्री महोदयांसमवेत बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाने दिनांक २४/०२/२०२३ च्या पत्रान्वये महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नासंदर्भात महाराष्ट्र शासन व कर्नाटक शासनाने नामनिर्देशित केलेल्या दोन्ही राज्यांच्या प्रत्येकी तीन-तीन मंत्र्यांची एकत्रित बैठक बोलावून त्यामध्ये घेतलेल्या निर्णयाचा अहवाल केंद्र शासनास कळविण्याबाबत विनंती केली होती. तसेच त्यानंतर दोन्ही राज्यात विधान सभेच्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर नवीन मंत्रीमंडळ अस्तित्वात आल्याने, गृह मंत्रालयाने दिनांक ९ जानेवारी, २०२६ रोजीच्या पत्राने महाराष्ट्र व कर्नाटक या दोन्ही राज्यानी नामनिर्देशित केलेल्या प्रत्येकी तीन अशा सहा मंत्र्यांची संयुक्त समिती सुधारित केली आहे. सदर संयुक्त समितीच्या बैठकीचे आयोजन, सदर दोन्ही राज्य शासनाच्या स्तरावर होणे तांत्रिकदृष्ट्या शक्य होणार नाही. सबब, मा. मुख्यमंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने सदर दोन्ही राज्याच्या संयुक्त मंत्री समितीची बैठक मा. केंद्रीय केंद्रीय गृहमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यासाठी दिनांक, वेळ व ठिकाण कळविण्याबाबत, मा. केंद्रीय गृहमंत्री यांना विनंती करण्याची बाब प्रस्तावित आहे.

ठराव क्र.७ बाबत - मराठी भाषा विकास प्राधिकरण स्थापन करण्याच्या अनुषंगाने विभागाच्या स्तरावरून कार्यवाही सुरू आहे.

ठराव क्र.८ बाबत - १) केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयाने भारतरत्न पुरस्काराबाबत निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये असे नमूद केले आहे की, THE RECOMMENDATIONS FOR "BHARAT RATNA" ARE MADE BY PRIME MINISTER HIMSELF TO THE PRESIDENT. NO FORMAL RECOMMENDATION FOR THIS IS NECESSARY." सदर मार्गदर्शक सूचनांप्रमाणे मा. पंतप्रधान स्वतः मा. राष्ट्रपती महोदयांना याबाबतच्या शिफारशी करतात. केंद्र शासन राज्य शासनाकडून भारतरत्न पुरस्कारासाठी शिफारशी मागवीत नाही.

२) तथापि, विविध संस्थांकडून येणाऱ्या मागण्या, सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद सदस्य यांनी केलेल्या शिफारशी व जनभावना लक्षात घेऊन, दिनांक २१/०९/२०१० च्या पत्रान्वये साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर "भारतरत्न" पुरस्कार जाहीर करण्याबाबत मा. पतंप्रधान महोदयांना विनंती करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर "भारतरत्न" पुरस्कार जाहीर करण्याबाबत पुन्हा एकदा सन २०२६ मध्ये केंद्र शासनाकडे शिफारस करण्याकरिता मा. मुख्यमंत्री महोदयांकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. मा. मुख्यमंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याचे प्रस्तावित असल्याचे सामान्य प्रशासन विभागाने (राजशिष्टाचार शाखा) कळविले आहे.

ठराव क्र.९ बाबत - अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०२६ मध्ये मा. मुख्यमंत्री महोदयांनी अर्थसंकल्पीय भाषणामध्ये यशवंतराव चव्हाण अनुवाद अकादमी स्थापन करण्यात येणार असल्याची घोषणा केली आहे. मराठी भाषा विभागामार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

ठराव क्र.१० बाबत - राज्यातील सर्व माध्यमाच्या महाविद्यालयांमधील ११ वी व १२ वी करिता मराठी हा विषय अनिवार्य करण्याबाबतच्या कायद्यामध्ये शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडून सुधारणा करण्यात यावी असे दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या पत्रान्वये शालेय शिक्षण विभागास कळविण्यात आलेले आहे.

ठराव क्र.११ बाबत - केंद्र सरकारच्या प्रचलित धोरणानुसार, अभिजात मराठी भाषेतील साहित्य व ग्रंथ, इत्यादींचा विकास, जतन, संवर्धन व संरक्षण करण्यासाठी आणि त्यांचा अनुवाद करण्यासाठी तसेच अभिजात मराठी भाषेचे अध्ययन व संशोधन करण्यासाठी आणि तिचा प्रसार व प्रचार करण्यासाठी, विविध प्रकल्पांची व योजनांची सुव्यवस्थितपणे अंमलबजावणी करण्याकरिता "अभिजात मराठी भाषा अध्ययन उत्कृष्टता केंद्र (Centre of Excellence for Studies in Classical Marathi)" स्थापन करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनास दिनांक १५/०९/२०२५ रोजी सादर करण्यात आला आहे. तद्नंतर यानुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने दिनांक १६/०१/२०२६ रोजी स्मरणपत्र केंद्र शासनास पाठविण्यात आले आहे.

"अभिजात मराठी भाषा अध्ययन उत्कृष्टता केंद्र (Centre of Excellence for Studies in Classical Marathi)" स्थापनेनंतर केंद्र शासनाच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

ठराव क्र.१२ बाबत - महाराष्ट्रात सरकारने जशी गुजराती अकादमी स्थापन केली आहे त्याच धर्तीवर गुजरातेत मराठी अकादमी स्थापन व्हावी यासाठी गुजरात शासनाला पत्र पाठविण्यात येत आहे.

ठराव क्र.१३ बाबत - गोवा या राज्यास भारतीय घटनेनुसार दिनांक ३०/०५/१९८७ रोजी स्वतंत्र राज्य म्हणून दर्जा देण्यात आला आहे. त्यामुळे त्या राज्याची राजभाषा कोणती असावी हा निर्णय गोवा राज्य शासनाच्या अखत्यारितील आहे. सदर मागणी साहित्य संमेलनामध्ये गोवा राज्य शासनाकडे करण्यात आली आहे.

ठराव क्र.१४ बाबत - महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सहाय्यक अनुदान आणि इमारत व साधनसामग्री यासाठी मान्यता) नियम, १९७० व (सुधारणा) २०१२ मंजुर करण्यात आला आहे. यामधील निकष/तरतूद आणि वेळोवेळी निर्गमित संबंधित शासन निर्णय/परिपत्रकांच्या अधीन राहून नोंदणीकृत सार्वजनिक ग्रंथालयांना शासनमान्यता देणे व शासनमान्य ग्रंथालयांना सहाय्यक अनुदान मंजूर करण्याची कार्यवाही नियमानुसार ग्रंथालय संचालनालयाकडून करण्यात येते.

महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम, १९६७ अतंर्गत तयार करण्यात आलेला महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सहाय्यक अनुदान आणि इमारत व साधसामग्री यासाठी मान्यता) नियम, १९७० यामध्ये नोंदणीकृत सार्वजनिक ग्रंथालयास रितसर शासनमान्यता देण्याची तरतुद असुन आंतरराष्ट्रीय दर्जाच्या ग्रंथालयांची उभारणी करण्याबाबत उक्त नमूद नियमात तरतूद नाही. सद्य:स्थितीत श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराजांच्या जन्मगाव कौळाणे येथे महाराज सयाजीराव गायकवाड सार्वजनिक वाचनालय, मु. पो. कौळाणे ता. मालेगाव जि. नाशिक हे शासनमान्य इतर - 'क' दर्जा/वर्ग ग्रंथालय कौळाणे येथे सुरु असून त्या ग्रंथालयाच्या माध्यमातून वाचकांना ग्रंथालयीन सेवा पुरवली जाते.

ठराव क्र.१५ बाबत - बडोदा येथे आयोजित ९६ व्या अ.भा.साहित्य संमेलनात बडोदयातील विमानतळास श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांचे नाव देण्याचा ठराव पारीत केला आहे. यानुषंगाने नमूद करण्यात येते की, महाराष्ट्र राज्यातील विमानतळांच्या अनुषंगाने कार्यवाही राज्य शासनाकडून करण्यात येते बडोदा विमानतळ हे गुजरात राज्यामध्ये आहे. गुजरात राज्य शासनाने तशा स्वरुपाचा ठराव विधानमंडळामध्ये पारित करुन केंद्र शासनाकडे पाठविणे अपेक्षित आहे

ठराव क्र.१६ बाबत - सदर ठरावान्वये कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषदेतर्फे कलबुरगी येथे मराठी कन्नड अनुवाद केंद्र स्थापन करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे. तथापि, सदर साहित्य परिषद ही कर्नाटक शासनाच्या अखत्यारितील आहे.

ठराव क्र.१७ बाबत - कर्नाटकातील होदगेरे येथे छ. शहाजी महाराज यांचे स्मारक उभारणीसंदर्भात या ठरावाच्या अनुषंगाने संबंधित विभागास उचित कार्यवाही करण्यासाठी पत्र पाठविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील सर ज.जी.समुह व गोकुळदास तेलपाल (जी .टी.) रुग्णालयातील विविध समस्यांबाबत

**(२०) * ३०८६९ श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सर ज.जी. समुह या रुग्णालयात राज्यासह देशभरातील अनेक रुग्ण उपचारासाठी येत असून रुग्णालयातील १ एमआरआय व १ सीटी स्कॅन मशीन बंद असल्यामुळे उपचारासाठी दाखल झालेल्या रुग्णांना चाचणीसाठी खाजगी लॅबमध्ये जावे लागत असल्याने त्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर रुग्णालयात, Gastroenterolgy, Hematology, Rheumatology विभागाच्या अभावामुळे येथे येणाऱ्या रुग्णांना आरोग्य सेवा मिळण्यास अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, जी .टी. रुग्णालयात कोटयवधी रुपये खर्चून उभारलेली एमआरआय मशिन ८ महिन्यांपासून कार्यान्वित नसल्याने रुग्णांना या अत्यावश्यक सेवेचा लाभ मिळत नसल्याचे दिनांक १२ फेब्रुवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय ,

(४) असल्यास, सदर मशिनचा पुरवठा केलेल्या संबंधित कंपनीचे ८० टक्के देयके (Payments) अद्याप प्रलंबित असल्याने कंपनीने यंत्राचे प्रस्थापकिरण (Installation) थांबविले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार रुग्णांची गैरसोय टाळण्याकरीता सर ज.जी. समुह रुग्णालयात एमआरआय व सिटी स्कॅन मशीन उपलब्ध करणे तसेच Gastroenterolgy, Hematology, Rheumatology चे स्वतंत्र विभाग निर्माण करणे व जी .टी. रुग्णालयात एमआरआय सेवा तातडीने सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही.

सर ज.जी.समुह रुग्णालये या संस्थेत एकूण ०२ एमआरआय मशिन पूर्णत: सुरु आहेत. तसेच ०१ सीटी स्कॅन मशिनचे आयुष्यमान जास्त झाल्यामुळे बंद असले तरी ०१ सी.टी स्कॅन मशिन कार्यरत असून सदर मशिनद्वारे रुग्णांना शक्य तितक्या लवकरात लवकर चाचणी करुन देण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

सर ज.जी.समुह रुग्णालये या संस्थेत Gastroenterology, Hematology, Rheumatology या विभागांचा अभाव असला तरी संबंधित आजाराच्या रुग्णांना त्यांच्या रुग्णसेवेमध्ये बाधा निर्माण होऊ नये याकरीता आवश्यकतेनुसार इतर शासकीय/बृहन्मुंबई महानगरपालिका रुग्णालयामार्फत त्यांना संदर्भ सेवा पुरविण्यांत येत आहे.

(३) हे अंशत: खरे आहे,

संचालनालयाने ३.०० टेस्ला एमआरआय या यंत्राच्या खरेदीकरीता मेसर्स विप्रो जीई हेल्थकेअर प्रा.लि. बैंगलोर यांना पुरवठा आदेश निर्गमित केले. त्या अनुषंगाने सदर पुरवठादारास एमआरआय मशीन प्रस्थापित करण्याकरीता जागा (साईट) हस्तांतरीत करण्यात आले.

सध्या एमआरआय यंत्रावर प्राथमिक चाचणी (Trials) सुरु असून त्यांचे परिणाम (Results) समाधानकारक आल्यास यंत्र आठवड्याभरात कार्यान्वित होणे अपेक्षित आहे.

गोकुळदास तेजपाल रुग्णालयात उपचाराकरीता येणाऱ्या अथवा दाखल होणाऱ्या रुग्णांना एमआरआय यंत्रावरील चाचणीची गरज भासल्यास त्यांना सर ज.जी. समूह रुग्णालय, मुंबई येथे निर्देशित (refer) करण्यात येते. त्यामुळे गोकुळदास तेजपाल रुग्णालयात येणारे रुग्ण एमआरआय यंत्राच्या सेवेपासून वंचित राहत होती/आहेत, हे खरे नाही.

(४) हे अंशत: खरे आहे.

पुरवठादारास दिनांक २६/०१/२०२६ रोजी रु.८.०० कोटी इतकी रक्कम प्रदान करण्यात आली आहे.

(५) सर ज.जी. समुह रुग्णालय आवारामध्ये नव्याने अतिविशेषोपचार रुग्णालयाचे बांधकाम सुरु आहे. सदर रुग्णालये हे लवकरात लवकर कार्यान्वित होणार असून त्यामध्ये Gastroenterology, Hematology, Rheumatology विभागांची अध्यापक वर्ग व आरोग्य सेवक इत्यादी विभाग कार्यान्वित होणार आहेत.

सर ज.जी.समुह रुग्णालयाकरीता ०१ एम.आर.आय. मशीन व ०१ सिटी स्कॅन मशीन या सार्वजनिक खाजगी भागीदारी (पीपीपी) च्या माध्यमातून मंजूर करण्यात आले आहे.

जी.टी.रुग्णालयात सध्या नविन स्थापित एमआरआय यंत्रावर प्राथमिक चाचणी (Trials) सुरु असून त्या समाधनकारक आल्यास यंत्र आठवड्याभरात कार्यान्वित होणे अपेक्षित आहे. त्यानंतर PCPNDT संदर्भातील सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता केल्यानंतर यंत्र रुग्णसेवेकरीता उपयोगात आणता येईल.

(६) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## जिल्हा परिषद, जालना कार्यालयात इमारत व शौचालय स्वच्छतेच्या कामामध्ये गैरव्यवहार होत असल्याबाबत

**(२१) * ३०१०८ श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना येथे जिल्हा परिषद कार्यालयीन इमारत व शौचालय स्वच्छतेसाठी गत दोन वर्षांपासून कंत्राट न देता रोजंदारी कर्मचारी नेमल्याच्या नावाखाली दरमहा सुमारे दीड लाख रुपये इतके देयके उपअभियंत्याच्या नावाने काढून गैरव्यवहार करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे :** (१) व (२) जिल्हा परिषद, जालना येथे कार्यालयीन इमारत व शौचालय स्वच्छतेसाठी गत दोन वर्षांपासून कंत्राट देण्यात आल्याचे आढळून आले नाही. तथापि कार्यालयीन इमारतीमधील स्वच्छता रोजंदारी कर्मचाऱ्यांकडून करुन घेतली जाते. सदरील बाब ही प्रशासकीयदृष्ट्या अनियमिततेची असून सदर प्रकरणात आर्थिक गैरव्यवहार झालेला नाही.

सदर प्रशासकीय अनियमिततेच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांचेकडील दिनांक ०५/०३/२०२६ व उपअभियंता (बांधकाम) यांना अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांचेकडील दिनांक २६/०२/२०२६ रोजी “कारणे दाखवा नोटीस” बजावण्यात आलेली आहे. संबंधितांचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात कर्करोग रुग्णांवर मोफत उपचार करणेबाबत**

**(२२) * ३१२६६ श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ‘स्वस्थ नारी, सशक्त परिवार’ या महिमेंतर्गत १,५१,१०,००० महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली असता त्यातील १७, ६१८ महिला कर्करोगाच्या संशयित आढळून आल्याचे माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संशयितांपैकी सर्वाधिक ३७४४ महिला नागपूर जिल्ह्यात, १२६९ महिला बुलढाणा जिल्ह्यात तर १४६० महिला अमरावती जिल्ह्यात आढळून आल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, गेल्या वर्षभरात तीन कोटी कर्करोग स्क्रीनिंग तपासण्या करण्यात आल्या असून त्यातील ४१,१६९ संशयित रुग्ण आढळले असून त्यापैंकी ५,९४४ रुग्णांच्या बायोप्सी करण्यात आल्या असून १,६७७ रुग्णांमध्ये कर्करोग निश्चित झाले असल्याचे दिनांक ४ फेब्रुवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यात कर्करोगाचे प्रमाण वाढत असल्याने या रुग्णांना मोफत उपचार तसेच कर्करोग विरोधी मोहिम व महिलांमध्ये कर्करोगाबद्दल जनजागृती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१), (२) व (३) अंशतः खरे आहे.

राज्यात “स्वस्थ नारी , सशक्त परिवार” या मोहिमेंतर्गत एकून १,१३,२२,४६५ महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे. नागपूर जिल्हयामध्ये ४७४ इतके, बुलढाणा जिल्हयात ३२० इतके तर अमरावती जिल्हयात २०४६ संशयति महिला कर्करोग रुग्ण आढळून आले आहे.

तसेच, राज्यात वर्षभरात ३,४३,२६,१०७ कर्करोग स्क्रिनिंग करण्यात आले असून त्यातले ४६,२०३ इतके रुग्ण संशयति आढळले त्यापैकी ६६७२ इतक्या रुग्णांच्या बायोप्सी करण्यात आली असून त्यापैकी १८६७ रुग्णांमध्ये कर्करोग निश्चित झाले आहे.
(४) राज्यात वाढते कर्करोगाचे प्रमाण रोखण्यासाठी व उपचाराकरीता महाराष्ट्र शासनाने खालील प्रमाणे उपाययोजना केलेल्या आहेत:-
कॅन्सर डे केअर युनिट (केमोथेरपी केंद्र)

सध्या महाराष्ट्रात ८ जिल्ह्यांमध्ये केमोथेरपी केंद्रे कार्यरत असुन उर्वरित जिल्ह्यांमध्ये आणखी २६ डे केअर केमोथेरपी (DCC) केंद्रे PPP तत्वावर स्थापन करण्यात येत आहेत.

सर्वसमावेशक कर्करोग सेवा-

राज्यातील जनतेस सर्वसमावेशक कर्करोग सेवा उपलब्ध करून देण्याकरीता कर्करोग रुग्णालयाद्वारे त्रिस्तरीय समग्र कर्करोग उपचार सेवेसाठी (L१, L२, L३) धोरण निश्चित करण्यात आले आहे. या धोरणानुसार :-

१. टाटा स्मारक रुग्णालय L१ स्तरावर कर्करोगाकरिता शिखर संस्था म्हणून कार्यरत राहील.

२. राज्यातील ९ केंद्रे L२ म्हणून कार्यरत राहतील. (छ. संभाजीनगर, चंद्रपूर, नागपूर, मुंबई ससून हॉस्पिटल, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय संलग्न रुग्णालय व नाशिक, अमरावती संदर्भ सेवा रुग्णालये)

३. तसेच राज्यातील ९ केंद्रे L३ म्हणून काम करतील. यामध्ये अंबाजोगाई, यवतमाळ, मुंबई, सातारा, बारामती, जळगाव व रत्नागिरी येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय संलग्न रुग्णालय तसेच ठाणे (जिल्हा रुग्णालय संलग्न) व शिर्डी संस्थांचे रुग्णालयांचा समावेश आहे.

राज्यभरातील कॅन्सर तपासणी आणि जनजागृती मोहीम दिनांक ४ फेब्रुवारी, २०२५ रोजी सुरू करण्यात आली असून या कार्यक्रमात ३० वर्षे व त्यावरील सर्व नागरिकांचा समावेश असून, राज्यभर तोंड, गर्भाशयमुख आणि स्तन कर्करोगासाठी सामूहिक तपासणी व लवकर निदान यावर विशेष भर देण्यात आला आहे.

कॅन्सर तपासणी व्हॅन राज्यातील ०८ परिमंडळांमध्ये प्रत्येकी १ अशी Diagnostic Cancer Van कार्यान्वित करण्यात आली आहे. ज्यामुळे एटीपीनुसार सर्व ३६ जिल्ह्यांचे कव्हरेज सुनिश्चित झाले आहे.

टाटा मेमोरियल सेंटरच्या Access to Affordable Cancer Care Project च्या सहकार्याने महाराष्ट्र कॅन्सर वॉरियर्स कार्यक्रमाची अंमलबजावणी राज्यभर करण्यात येत आहे.

राज्यात राष्ट्रसंत तुकडोजी रिजनल कॅन्सर हॉस्पिटल व रिसर्च सेंटर, नागपूर आणि विवेकानंद मेडिकल फाऊनडेशन व रिसर्च सेंटर, लातूर या संस्थांना केंद्र शासना मार्फत अनुदान देण्यात येत आहे. सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत नाशिक व अमरावती या जिल्ह्यांमध्ये विभागीय संदर्भीय सेवा रुग्णालय कार्यरत आहेत. राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या अंतर्गत असलेली वैद्यकीय महाविद्यालये आणि टाटा कॅन्सर हॉस्पिटल मार्फत कर्करोगग्रस्त रुग्णांना उपचार देण्यात येतात. तसेच महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य (MJPJAY) योजनेच्या माध्यमातून खाजगी तसेच सरकारी अंगीकृत रूग्णालयामार्फत कर्करोग ग्रस्त रुग्णांना उपचार देण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## साकिनगट्टा (ता.अहिरे, जि.गडचिरोली ) येथील अंगणवाडी केंद्रात खराब पोषण आहाराचे वाटप झाल्याबाबत

**(२३) * २४२५९ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साकिनगट्टा (ता.अहिरे, जि.गडचिरोली ) येथील अंगणवाडी केंद्रातील विद्यार्थ्यांना आणि गरोदर मातांना देण्यात येणारा पोषण आहार खराब असल्याने त्यासंबंधातील निवेदन स्थानिक नागरिकांनी स्थानिक लोकप्रतिनिधी यांना दिल्यानंतर त्यांनी सदर प्रकरणाची चौकशी करण्याचे निदेश अहेरी येथील बाल विकास प्रकल्प अधिकारी व सुपरवायझर यांना दिनांक ११ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाल विकास प्रकल्प अधिकारी, अहेरी यांनी सदर अंगणवाडी केंद्राला भेट दिली असता तेथील वाटाणा, गहू, तांदूळ व डाळ हे खराब असून त्यामध्ये अळया असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पोषण आहार पुरवठा करण्यात आलेल्या वस्तूंची प्रयोगशाळा मार्फत चौकशी केली आहे काय, असल्यास, त्याबाबतचा अहवाल प्राप्त झाला असल्यास त्याचा तपशिल काय आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार यास जबाबदार असण्या-या संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) हे खरे आहे.
(२),(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी चौकशी अंती निदर्शनास आले की, माहे जून ते सप्टेंबर, २०२५ या कालावधीकरिता पुरवठा झालेल्या कच्च्या धान्यांपैकी गहू, तांदूळ व डाळ हे सुस्थितीत होते. तथापि, त्या दरम्यानच्या काळात झालेल्या मुसळधार पावसामुळे केवळ वाटाणा खराब असल्याचे दिसून आले होते. ही बाब लक्षात येताच संबंधित अंगणवाडी सेविकेने तो वाटाणा तात्काळ बाजूला काढून ठेवला होता. तसेच, सदर वाटाणा खराब असल्याने संबंधित पुरवठाधारकाकडून त्या बदल्यात चांगल्या दर्जाचा माल बदलवून घेण्यात आला आहे. तसेच या कालावधीत गडचिरोली जिल्ह्याला पुरवठा झालेल्या पोषण आहाराची, जिल्हा कार्यक्रम अधिकारी यांच्यामार्फत शासनमान्य प्रयोगशाळेमध्ये तपासणी करण्यात आली होती. सदर तपासणीअंती प्राप्त झालेल्या अहवालानुसार, या आहारामध्ये शासनाने निर्धारित केल्यानुसार आवश्यक उष्मांक आणि प्रथिने असल्याचे दिसून आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील गटप्रवर्तक, आशा स्वयंसेविका यांच्या विविध मागण्यांबाबत**

**(२४) * ३१५६९ श्री.विलास तरे (बोईसर), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील गटप्रवर्तक व आशा स्वयंसेविकांना केंद्र व राज्य शासनाचे नियमित मानधन माहे नोव्हेंबर, २०२५ पासून मिळावे, ऑनलाइन कामांची सक्ती करण्यात येऊ नये, अँड्रॉइड मोबाइल फोन देणे व इतर मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य गटप्रवर्तक व आशा स्वयंसेविका संघाच्या वतीने पालघर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा माहे फेब्रुवारी, २०२६ च्या दुसऱ्या आठवड्यात काढण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्येक गटप्रवर्तक व आशा स्वयंसेविकांकडे अँड्रॉइड मोबाइल फोन नसल्यास त्यांना कामावरून कमी करण्याची धमकी देण्यात आल्यामुळे काही आशा स्वयंसेविकांनी स्वखर्चाने मोबाइल खरेदी केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात सन २००५ पासून जवळपास ३९०० गटप्रवर्तक महिला आशा सुपरवायझर म्हणून कार्यरत असून त्यांना ११ महिन्यांची ऑर्डर देऊन ब्रेक देत परत नियुक्ती केली जाते तसेच त्यांना मानधन वेळेवर अदा करण्यात येत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गटप्रवर्तक व आशा स्वयंसेविक यांना सेंट्रल आणि स्टेट फंड अशा वेगळ्या स्वरूपात दिले जाणारे मानधन हे एकत्र देण्याबाबत तरतूद करण्यात येणार आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार महाराष्ट्र राज्य गटप्रवर्तक व आशा स्वयंसेविका संघाच्या मागण्यांच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) राज्यात ग्रामिण व नागरी भागात एकूण ८१,८९९ आशा स्वंयसेविका व ३६६४ गटप्रवर्तकांची पदे मंजूर असून त्यापैकी ७९३९२ आशा स्वंयसेविकांची व ३६१२ पदे गटप्रवर्तकांची भरलेली आहेत. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षापासुन आशा स्वंयसेविकांना ऑनलाईन कामांकरिता मासिक रू. ३००/- मोबाईल भत्ता

उपलब्ध करून देण्यात येत आहे. आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक ही पदे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार कामावर आधारित मोबदला या तत्वावर नियुक्त करण्यात येतात. राज्य शासनाकडील मानधन मासिक तत्वावर उपलब्ध करुन देण्यात येते.

(४) व (५) आशा स्वंयसेविका व गटप्रवर्तक यांना राज्य शासनाकडील मानधन मासिक तत्वावर उपलब्ध करुन देण्यात येते. तथापि, केंद्र शासनाचे मानधन निधी उपलब्ध झाल्यानंतर त्या-त्या वेळेस त्वरेने अदा करण्यात येते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला औद्योगिक वसाहतींमधील भूखंडावर प्रशस्त बार आणि रेस्टॉरंट उभारल्याबाबत

**(२५) * २५५०४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला औद्योगिक वसाहतींमध्ये एका व्यापाऱ्याने वर्कशॉपच्या नावाखाली घेतलेल्या भूखंडावर प्रशस्त बार आणि रेस्टॉरंट उभारल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर एमआयडीसी क्षेत्रात भूखंडाचा घोटाळा, आरक्षित भूखंड औद्योगिक भावात वितरित करणे तसेच खुले भूखंड ग्रीन स्पेस (Green Space - उद्याने, हिरवळी) यांच्या वितरणात होणारी अनियमितता यासारख्या अनेक तक्रारी शासनाकडे करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर क्षेत्रात अन्न व औषध प्रशासनाने वितरीत केलेला भूखंड क्र. टी-९० हा भूखंड वितरित असून या जागी हॉटेल न चालवता टी-५५ या जागेवरती हॉटेल चालवत असल्याचा परवाना देवून गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत भूमापक अधिकारी यांनी या संपूर्ण प्रकरणाचा अहवाल वरिष्ठ अधिकारी यांचेकडे दिनांक ६ ऑगस्ट, २०२४ रोजी पाठवून सात दिवसाची मुदत दिली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने विलंब करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) होय, हे अशंत: खरे आहे.

सदर उद्योजक अवैधरित्या हॉटेल चालवत असल्याने नोटिस बजावण्यात आलेली आहे. तद्नंतर सदर उद्योजकाने दिवाणी न्यायालय (वरीष्ठ स्तर) अकोला येथे R.C.S.-९८/२०२५ नुसार दावा दाखल केलेला आहे.

(२) हे खरे नाही.

अशा प्रकारच्या कोणत्याही तक्रारी म.औ.वि. महामंडळाकडे प्राप्त झालेल्या नाहीत.

(३) हे अंशत: खरे आहे.

अकोला औद्योगिक वसाहतीत भूखंड क्र.टी-९० या क्रमांकाचा भूखंड अस्तित्वात नाही. तथापि, भूखंड क्र.टीई-९० क्षेत्रफळ १९७.७६ चौ.मी. श्री.क्रिष्णकुमार शामलाल लुल्ला, मालक मे.क्रिष्णकुमार लुल्ला यांना दिनांक ०५/०४/२०२१ रोजी ईलेक्ट्रीकल्स वर्क करीता हस्तांतरीत केलेला आहे. सदर भूखंडावर अनधिकृत कनिष्क रेस्टॉरंट व बार चालवत असल्याचे दिनांक ०४/०१/२०२५ रोजी निदर्शनात आले. भूखंड क्र.टि-५५ हा भूखंड क्षेत्रफळ ५९९२ चौ.मी. श्री.भुषण उध्दव गावंडे, मालक मे.अथर्व पॉलीमर्स यांना दिनांक १८/०१/२०१८ रोजी हस्तांतरीत करण्यांत आलेला आहे, तदनंतर या कार्यालयाचे परवानगी पत्र क्र. ए-२५२७२ दिनांक १९/०१/२०२३ नुसार प्लॅास्टिक बॅग ऐवजी कृषी उत्पादनाच्या बदलास परवानगी देण्यात आलेली आहे. टी-५५ या भूखंडावर हॉटेल (बार) चालू नाही.

(४) व (५) सदर नोटिस भुखंडधारक श्री.कृष्णकुमार शामलाल लुल्ला मेसर्स कृष्णकुमार लुल्ला भूखंड क्र. टिई-९० यास विनापरवाना उत्पादन बदल केल्याप्रकरणी बजावण्यात आली होती.

सदर नोटीसविरुध्द संबंधित व्यावसायिकाने मा. दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर) अकोला येथे दावा क्र. R.C.S./९८/२०२५ दाखल केला आहे. त्यावर मा. न्यायालयात सुनावणी सुरु असून, प्रस्तुत प्रकरणी कोणतीही कार्यवाही करण्यास मा. न्यायालयाने स्टेटस को (Status Quo) चे आदेश दिनांक १८/०२/२०२५ रोजी दिलेले आहेत. त्यामुळे पुढील कार्यवाही होऊ शकली नाही. सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.